## गद्य विभाग

१. उमाइनमसकारें आंगुठा लावणे : म्हाइंभट
२. सार्वजनिक सत्यधर्म : महात्मा जोतीराव फुले
३. वाचन : गोपाळ गणेश आगरकर
४. भारतीय संविधानाची विज्ञान निष्ठा : यशवंत मनोहर
५. ही श्री ची इच्छा : श्रीनिवास ठाणेदार

## पद्य विभाग

१. संतवाणी : संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखामेळा, संत तुकाराम
२. या भारतात बंधुभाव नित्य वसु दे : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
३. झपूर्झा : केशवसुत
४. माझ्या मना दगड : विंदा करंदीकर
५. पाऊस : ग्रेस

## व्यावहारिकक मराठी

१. प्रसार माध्यमांसाठी लेखन : डॉ. संजय भक्ते
२. शुद्धलेखन

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप आणि गुण विभाजन

वेळ : ३ तास एकूण विष : ६०

प्रश्न १. निबंध लेखन

खालील दोन पैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २०० शब्दात निबंध लिहा. गुण १०

विज्ञानावर
सामाजिक समस्या

प्रश्न २. दीर्घोत्तरी प्रश्न
खालील प्रश्नांची सुमारे १०० शब्दात उत्तरे लिहा. (गद्य विभाग)
सहा प्रश्नांपैकी चार प्रश्न गुण २०

प्रश्न ३. दीर्घोत्तरी प्रश्न
खालील प्रश्नांची सुमारे १०० शब्दात उत्तरे लिहा. (पद्य विभाग)
सहापैकी चार प्रश्न गुण २०

प्रश्न ४. व्यावहारिक मराठी गुण १०
प्रसार माध्यमांसाठी
लेखन शुद्धलेखन

**अमित वासुदेव गजभिये**
**मराठी विभाग**
**डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस.**
**कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नागपूर**
**मो. ९६७३४५६४८४**

## उमाइनमसकारें आंगुठा लावणे
## म्हाइंभट

१. 'उमाइनमस्कारें अंगुठा लावणे' या लीळेतून अंधश्रद्धेवर कसा प्रकाश टाकला आहे.

**किंवा**

'उमाइनमस्कारें अंगुठा लावणे' या लीळेतून आलेल्या तत्कालीन काळातील सामाजिक परिस्थितीचे वर्णन करा.

'उमाइनमस्कारें अंगुठा लावणे' ही लीळाचरित्राच्या उत्तरार्धातील लीळा आहे. परंपरागत अंधश्रद्धेत पिचल्या जाणाऱ्या समाजात स्त्रियांवर लादण्यात आलेल्या बंधनांना मोडून काढत स्त्रियांना समतेचा, स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करणारे क्रांतिकारी विचार चक्रधर स्वामींनी आपल्या कृतीतून रुजवत तत्कालीन समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन मांडला. हे म्हाइंभट्टानी या लीळेतून सांगितले आहे.

एके दिवशी गोसाव्यांना म्हणजेच नागदेवाचार्यांना सकाळचा पूजा अवसर झाला. नंतर गोस्वामी विहाराला गेले. त्यावेळी तिथे उमाइसा दाराजवळ एका कोपऱ्यात बसली होती. तिला विटाळ झाला होता म्हणून गोसाव्यांना दुरूनच नमस्कार केला. गोसाव्यांनी आपल्या पायाचा अंगठा तिच्या कपाळाला लावला. त्यामुळे उमाइसेला संकोच झाला. त्यावर चक्रधर स्वामी म्हणाले, 'हे काय बाई! या अंगठ्याला विटाळ केला?' त्यावर उमाइसा म्हणाली, नाही स्वामी, मी स्पर्श नाही केला. गोसाव्यांनीच श्रीचरण वर उचलले. तेव्हा श्रीचक्रधर स्वामी नागदेवाचार्यांना म्हणाले, "वानरेया ! या अंगठ्याला विटाळ झाला. आता याला पवित्र करण्याकरिता लोणारला न्यावे लागेल, केदारनाथला न्यावे लागेल, मल्लिकानाथला न्यावे लागेल."

पुढे चक्रधर स्वामी म्हणाले, बाई, नऊ नाड्यांमध्ये बहात्तर ग्रंथी आहेत. नऊ नाड्यांमध्ये ही एक नाडी आहे. एक कृष्ण नाडी, एक शुक्ल नाडी. मग कृष्णेचा विटाळ का व्हावा? शुक्लेचा विटाळ का न व्हावा? त्याचे काहीच नाही. कुठल्या प्रसंगी कुठलीशी नाडी स्त्रवते. एक अंतर्गत स्त्रवते तर एक बहिर्गत स्त्रवते. चक्रधर स्वामीच्या या बोलण्यातून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आपल्याला परिचय येतो. तेव्हा उमाइसा विचारते, "जी जी, हे विटाळ काय आहे जी?" त्यावर सर्वज्ञ सांगतात आपले शरीर हे नवद्वारांचे आहे. ज्याप्रमाणे नाकात शिंगूड येतो, डोळयात चिपळ येतो, कानात मळ येतो, तोंडात थुंकी येते, गुरुद्वारातून मळ येतो. त्याचप्रमाणे स्त्री देवातून एक धातू स्त्रवतो व निघून जातो. त्याचा विकल्प धरू नये. जर विकल्प धरला तर आपल्या देहाची प्रतारणा होईल. त्यावर उमाइसा आजपासून विटाळ धरणार नाही असे म्हणते.

अशाप्रकारे चक्रधर स्वामींनी उमाइसेला स्त्री देहाचा आणि एकूणच स्त्री स्वातंत्र्याचा उपदेश केला आहे. त्यांच्या या कृतीतून वैज्ञानिक दृष्टिकोन दिसून येतो.

**सार्वजनिक सत्यधर्म**
**महात्मा जोतिबा फुले**

१. गणपतराव आणि जोतिराव यांच्या संवादातून कोणता संदेश व्यक्त होतो ते 'सार्वजनिक सत्यधर्म' या पाठाच्या आधारे समजावून सांगा.

गणपतराव आणि जोतिराव यांच्यातील संवाद सार्वजनिक सत्यधर्म या पाठातून प्रश्न-उत्तर रूपाने वर्णिलेला आहे. गणपतराव जोतिरावांना पुढील प्रश्न विचारतात.

१. महासत्पुरुषांच्या निरनिराळया धर्म पुस्तकात त्यांच्या समजूतीप्रमाणे पुरुषांच्या हक्काविषयी काहींना काही जरी सत्य सांगितले आहे तर त्यांच्या अनुयायांमध्ये मध्ये भेदभाव का?

गणपतरावाच्या या प्रश्नाला उत्तर देताना जोतिराव असे म्हणतात या, हे महासतपुरुष दुसऱ्याच्या धर्माचा मुळीच विचार न करता माझाच धर्म खरा आहे असा हट्ट करतात. त्यामुळे त्यांच्या अनुयायात भेदभाव पडला आहे.

२. हे महासतपुरुष धर्म पुस्तकातील सत्याविषयी सारासार विचार करूनही परस्परांशी व्यर्थ शत्रुत्व का निर्माण करतात?

हे सतपुरुष त्यावेळच्या अज्ञानी लोकातील सत्य आचरणाच्या अनुमान स्थितीविषयी सारासार विचार करीत नाहीत, त्यामुळे तसे घडून येते.

३. सध्याप्रमाणे अतिप्राचीन काळचे मानव समंजस्य नव्हते का?

सध्या प्रमाणे अतिप्राचीन काळचे मानव जर समंजस्य असते तर त्यांनी अतिशूद्र मानवास नीच समजण्याची वहीवाट पाडली नसती. त्याचप्रमाणे प्राचीन काळचे मानव धिक्काराने पराजित केलेल्या मानवांच्या मुलामुलीस आपल्या कुणबीणी व दास करून त्यांना आपली सेवाचाकरी करण्यास लावणी नसती. एखाद्या धर्म पुस्तकात महासत्पुरुषांनी प्रसिद्धपणे लिहून ठेवले नसते. यावरून ते हट्टी स्वभावाचे असून दुसऱ्यांचा सूड घेणारेे होते.

४. धर्म पुस्तक कसे असावे
या भूतलावावर सर्व स्त्री-पुरुषांनी आपले एक कुटुंब समजून एकमताने व एकजुटीने एकमेकांशी सत्य वर्तन करावे. तसेच सर्व स्त्री-पुरुषांनी जर सत्य आचरण केले असते तर एकंदर सर्व जगातील शिपाई, पोलीस, न्यायाधीश व तुरुंगातील शिपाई यांची अजिबात गरज पडली नसती.

५. जगातील सर्व स्त्री-पुरुषांनी कोणत्या धर्माचा स्वीकार करावा?

जगातील सर्व स्त्री पुरुषांनी स्त्री पुरुष मानवांनी आपापल्या मर्जीप्रमाणे धर्म स्वीकारावा. पत्नीने बौद्ध धर्म स्वीकारावा. पतीने ख्रिस्ती व्हावे. मुलीने मुसलमान व्हावे आणि मुलाने सार्वजनिक सत्यधर्म वाचून सार्वजनिक सत्यधर्मी व्हावे आणि या सर्व मातापित्यांसह आपला प्रपंच करत असताना कोणाच्याही धर्माचा द्वेष करू नये.

६. या भूमंडळावर जेवढे धर्म आहेत ते सार्वजनिक सत्याची लेकरे आहेत बाई?

होय, सर्व धर्मास अनुयायी लोकांनी नमून सार्वजनिक सत्यास साष्टांग नमस्कार करावा. तसेच प्रत्येक स्त्री-पुरुष मानवाने दुसऱ्या व्यक्तीचे नुकसान न करता त्यास कोणत्याही तारेचे तऱ्हेचे आचरण करण्यास अधिकार जर आहे तर कोणत्याही धर्मासह त्यांच्या अनुयायी लोकांची आवडनिवड न करता त्या सर्वांबरोबर बहिण-भावंडा प्रमाणे सत्य वर्तन करण्याचा क्रम चालू करावा, ईश्वरासमोर आपण धन्य होऊ

एकंदरीत या संवादातून जोतीराव फुले असा मौलिक संदेश देतात की, या एकाच कुटुंबातील घटक विविध धर्मपालन करणारे असू शकतात; कारण सर्व धर्म हे सार्वजनिक सत्याची लेकरे आहेत.

२. महात्मा फुल्यांचे सार्वजनिक सत्य धर्माविषयीचे विचार स्पष्ट करा?

महात्मा फुल्यांच्या मते सर्वधर्म हे सार्वजनिक सत्याची लेकरे आहेत. एकाच कुटुंबातील घटक विविध धर्म पालन करणारे असू शकतात. प्रत्येकाने आपल्या मर्जीप्रमाणे धर्म स्वीकारावा. इतकेच नव्हे तर वेगवेगळया कुटुंबातील लोकांनी वेगवेगळे धर्म स्वीकारण्यास मुभा असावी.

एकाच कुटुंबातील मुला मुलीने किंवा पती पत्नीने त्यांच्या मर्जीप्रमाणे धर्म स्वीकारण्यास हरकत नसावी. पतीने बौद्ध धर्म स्वीकारावा. पत्नीने ख्रिस्ती व्हावे. मुलीने मुसलमान व्हावे आणि मुलाने सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक वाचून सार्वजनिक सत्यधर्मी व्हावे आणि या सर्व मातापित्यांसह कन्यापुत्रांनी आपला प्रपंच करीत असताना प्रत्येकाने कोणी कोणाच्या धर्माचा द्वेष करू नये आणि त्या सर्वांनी सर्वांच्या निर्माण कर्त्याने निर्माण केलेली लेकरे असून त्याच्याच कुटुंबातील आहोत असे समजून प्रेमाने व गोडी गुलाबीने वर्तन करावे. म्हणजे ते आपल्या सर्वांच्या निर्माण कर्त्यांच्या राज्यात धन्य होतील. यावरून सर्व अनुयायी लोकांनी सर्व धर्मांसह नमून सार्वजनिक सत्यास मान द्यावा. तसेच प्रत्येक स्त्री-पुरुष मानवाने दुसऱ्याचे व्यक्तीचे नुकसान न करता सर्वांशी बंधू भावाने वागावे.

थोडक्यात, सर्व धर्मात काही ना काही सत्य असल्याने सार्वजनिक सत्याचा समावेश असून ते सर्व प्राणिमात्र एकाच निर्मिकाची म्हणजेच परमेश्वराची लेकरे आहेत. प्रत्येकाला आपल्या मर्जीप्रमाणे वागण्याचा पूर्ण अधिकार असून कोण कोणीही कोणाच्या धर्माचा धर्माच्या आड येऊ नये किंवा त्याला दोष देऊ नये. तसेच सर्व स्त्री पुरुषांनी एकाच कुटुंबातील घटकांप्रमाणे परस्परांशी प्रेमाने वागावे व आपल्या निर्मिकास संतोष द्यावा.

## वाचन
## गोपाळ गणेश आगरकर

१. गोपाळ गणेश आगरकरांनी 'वाचन' या पाठातून वाचनाचे कोणकोणते फायदे सांगितले आहेत?

गोपाळ गणेश आगरकर 'वाचन' या पाठातून असे सांगतात की बहुश्रुत अशा संमित्रांच्या सहवासापासून होणारे अनेक फायदे आहेत. त्याचप्रमाणे चांगल्या वाचनापासून अशा सहवासातही होणार नाहीत असे फायदे आहेत. वाचन करण्यास फार मोठा खर्च करावा लागत नाही. विद्वान गुरु भेटेल किंवा भेटणार नाही. संवाद साधण्यासारखा मित्र प्राप्त होईल अथवा न होईल; स्वतंत्रपणे बिनचूक विचार करता येण्यासारखे शिक्षण मिळाले असेल किंवा नसेल, सहज घेता येणारे किंवा बुद्धीद्वारे घ्यावे लागणारे अनुभव घेऊन पाहण्याची सोय असतील किंवा नसतील; परंतु वाचनाची मात्र तशी स्थिती नाही मुद्रणकला भरभराटीस आल्यापासून हे ज्ञानसाधन अत्यंत सुगम झाले आहे. किंबहुना काही स्थितीत ज्ञान करून घेण्यास दुसरे कोणतेही साधन उपयोगी पडत नाही. कोणत्याही विषयावरील आपले विचार सर्व ठिकाणी स्वतः हजर राहूनन स्वमुखाने सांगता येणे अशक्य आहे. पण तेच लिहून काढले व पुस्तक रूपाने प्रसिद्ध केले तर त्यापासून पाहिजे तसा फायदा करून घेता येतो.

२. आपण वाचनाची सवय का लावली पाहिजे असे गोपाळ गणेश आगरकर म्हणतात?

संसारात वारंवार येणाऱ्या अडचणीतून पार पडण्यास वाचनापासून सहाय्य होते व हा वाचनापासून होणारा हलक्या प्रतीचा फायदा आहे असे गोपाळ गणेश आगरकर म्हणतात. ज्यांना जिवंतपणी आपणास हे मागल्या पिढीचे असे म्हणून घ्यायचे नसेल तर त्यांनी वाचनाची सवयी जिवंत ठेवली पाहिजे. जगात प्रतिवर्षी नवीन कल्पना, नवीन शोध, नवीन युक्त्या निघून जुन्या कल्पना, जुने शोध व जुन्या युक्त्या एकापाठीमागून एक मागे पडत आहेत. जे शाळेत किंवा विद्यालयात संपादलेल्या ज्ञानासाच चिकटून राहतात व व्यवहारात पडल्यावर वाचनाची सवय ठेवत नाही, त्यांना आपल्या जुनेपणाबद्दल आपला उपवास करून घ्यावा लागतो. शिक्षक, वैद्य, कारागीर, नोकर यापैकी ज्यांनी वाचनाची सवय ठेवलेली असते त्यांना त्यांच्या व्यवसायात झालेल्या सुधारणा करणार नाही व पर्यायाने त्यांचे फार मोठे नुकसान होईल. त्यामुळे ठळक ठळक गोष्टींची चालू तारखेपर्यंत काय हालचाल आहे हे माहीत असणे आवश्यक आहे, असे गोपाळ गणेश आगरकर 'वाचन' या पाठातून सांगतात.

# भारतीय संविधानाची विज्ञाननिष्ठा
## डॉ. यशवंत मनोहर

१. 'भारतीय संविधानाची विज्ञाननिष्ठा' या पाठातून डॉ. यशवंत मनोहर यांनी कोणत्या संविधानिक मूल्यांची चर्चा केली आहे?

'भारतीय संविधानाची विज्ञाननिष्ठा' या डॉ. यशवंत मनोहर यांच्या पाठातून संविधानातील विज्ञाननिष्ठा प्रदीर्घपणे चित्रीत झाली आहे. भारतीय संविधानाने दिलेली जीवनमूल्ये ही वैश्विक आहेत. ही मूल्ये जात, वर्ग, वर्ण, पंथ धर्म, पक्ष, ईश्वर आणि भाषा यांच्या सीमारेषेत अडकून पडत नाहीत. ही मूल्य म्हणजे विधायकता, असीमता, संपूर्ण प्रज्ञा, सम्यकता आणि संपूर्ण साकल याचीही मूल्य म्हणजे विधायकता असिंकता संपूर्ण प्रज्ञा सम्यकता आणि संपूर्ण साकल्याची उज्ज्वलता आहे. या मूल्यांना सीमा नाही. अशा नैतिक मानवधिष्ठित मूल्यांचा पाया हा विज्ञाननिष्ठ आहे. या पायावरच संविधानाने मानवी जीवनासाठी मानवतावादाची संरचना केली आहे. व्यक्तीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाला केंद्रस्थानी ठेवून विचार करणे आणि या विचारात विकास घडवून आणणे हे विज्ञानाची प्रक्रिया आहे. विज्ञाननिष्ठा मानवाची ही केंद्रीय वृत्ती आहे. माणसाचे माणूसपण जपणारी ही विज्ञान नीती माणसाला परावलंबी न बनवता स्वयंप्रकाशाचा मार्ग दाखवणारी नीती आहे. मानवाचा वैश्विक दृष्टिकोन विकसित करून स्वतंत्रता, समता, बंधुभाव, भगिनीभाव प्रस्थापित करणारा भारतीय नागरिक निर्माण करणे हाच विज्ञानिष्ठ संविधानाचा खरा उद्देश असल्याचे डॉ. यशवंत मनोहर सांगतात.

भारतीय संविधानाची मूल्ये  ही सर्वांच्या हिताची आहेत. या मूल्यांमुळेच एकूणच जगातील कोणाचेही अहित होत नाही. ही मूल्ये काळाला  पुरून उरणारी, काळाला सतत नवनवे करणारी आहेत. ही मूल्य संविधानाची उद्देशपत्रिका, मूलभूत अधिकार आणि मूलभूत कर्तव्य या भागात अंतर्भूत झालेली आहेत. ही मूल्ये वैश्विक आहेत. माणसाच्या मनाची पुनर्बांधणी या मूल्यांची उत्कट इच्छा आहे. ही कुण्या व्यक्तीच्या, काही व्यक्तींच्या किंवा कुण्या वर्गाच्या, कोण्या देशाच्या हितसंबंधाची रचना नाही. सर्वच मानव जातीच्या हितसंबंधाचे संविधान आहे. ही मूल्ये जातमूल्ये नाहीत. या महान मूल्यांना अशा कोणत्याच सीमा नाहीत. ही मूल्ये धर्ममूल्ये नाहीत, वर्गमूल्ये नाहीत. ही मूल्ये धर्मातीत जीवनाचा आदर्श प्रस्थापित करू इच्छिणारे मूल्ये आहेत. ही मूल्ये संपूर्णच मानवी जीवनाचे नवे व्यवस्थापन करू शकणारी मूल्ये आहेत. एकसंघ पृथ्वी, एकसंघ माणूस म्हणजे ॲनिमेशनमुक्त माणूसच या मूल्यांच्या नजरेत आहेत. मी आदीही आणि अंतही माणूस आहे. मी कुंपणातीत माणूस आहे, मी अखंड माणूस आहे, असे वाटणारा माणूस या मूल्यांच्या नजरेत आहे.

ही मूल्ये महान आहेत. त्यांचे कारण वरीलप्रमाणे आहे. जगातील सर्वच देशांशी सहकार्य म्हणजे येथील माणसांशीच सहकार्य करणे होय. या सहकार्यामागील अधिष्ठानभूत तत्व बंधुता आणि भगिनीता हेच आहे. माणूस बंधनमुक्त व्हावा, त्याला मर्यादित करणाऱ्या सर्व चौकटी वितळून जाव्यात आणि माणूस अंतरिक्षारखा सीमातित व्हावा. माणसाच्या माणुसकीला कोणतेही किनारे नसावेत. कुठूनही बघा मी वैश्विकच आहे असे प्रत्येक माणसाला सांगता आले पाहिजे. भारतीय संविधानाच्या इच्छेचाच हा आशय आहे. या महान वैश्विक मूल्यांच्या मुखाने हे संविधान बोलत आहे, म्हणून बाबासाहेबांच्या शब्दात असे म्हणावेसे वाटते की, In our constitution we have put forward to forward the ideal of secular socialist universality येथे त्यांनी डेमोक्रसीऐवजी युनिव्हर्सलिटी हा शब्द जाणिकपूर्वक वापरला आहे. मूलभूत कर्तव्याची नोंद बाबासाहेबांनी एक्कावनव्या अनुछेदामध्ये केली आहे. त्या ते म्हणतात, To develop scientific temper humanism and the spirit of inquiry and reforms. संविधानाला अभिप्रेत असलेल्या समाजवस्तूचा तात्विक पायावरील अवतरणात आलेला आहे. यात विज्ञाननिष्ठा आहे. चिकित्सा आहे आणि पुनर्रचनाही आहे; कारण चिकित्सेशिवाय विज्ञानदृष्टी संभवत नाही आणि जीवनाची पुनर्रचना चिकित्सेशिवाय शक्य नाही. हा तत्त्वज्ञानिक पाया इहवादाचा आणि बुद्धिवादाचा आहे. चिकित्सा हेच या सर्व पायाभूत मूल्यांचे नियंत्रण आहे.

अशाप्रकारे 'भारतीय संविधानाची विज्ञाननिष्ठा' या पाठातून डॉ. यशवंत मनोहर यांनी संविधान आणि विज्ञाननिष्ठ या दोन्हीचा संबंध विविध उदाहरणाद्वारे योग्यरीत्या उलगडून दाखवलेला आहे.

२. 'भारतीय संविधानाची विज्ञाननिष्ठा' या पाठातून भारतीय संविधानातून वैज्ञानिक दृष्टिकोन कशाप्रकारे वाढीस लागला आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन प्रत्येक भारतीय नागरिकांमध्ये वाढीस लागावा, अशी भारतीय संविधानाची इच्छा आहे. असा वैज्ञानिक दृष्टी लाभलेला माणूसच सामाजिक चौकटीच्या बाहेर पडून खऱ्या अर्थाने भारतीय नागरिक बनू शकतो. परंपरेने त्याला दिलेल्या वा त्याच्यावर लादलेल्या चौकटी फेकणारा माणूसच मी पूर्णता भारतीय आहे असे म्हणू शकतो. एक्कावन्नावा अनुच्छेद म्हणतो, त्याप्रमाणे धार्मिक, भाषिक, प्रादेशिक आणि वर्गीय भेदाच्या पलीकडे गेलेला माणूस भारतीय नागरिक ठरू शकतो. हा भारतीय नागरिक परंपरेने दिलेल्या चौकटीच्या पलीकडे गेलेला नागरिक असतो, म्हणजेच परंपरेच्या चौकटी तोडणे ही कृती संविधानाला अभिप्रेत आहे.  भारतीय संविधान बंधुभाव वाढीस लावावा असे म्हणते. याचे कारण संविधान पूर्वकाळात बंधुभावाची आणि एकोप्याची फार वाहतात झाली आहे असे म्हणता येईल.

अशाप्रकारे वैज्ञानिक दृष्टिकोन भारतीय संविधानातून वाढीस लागला आहे.

## ही श्रीची इच्छा
## श्रीनिवास ठाणेदार

१. 'ही श्रीची इच्छा' या पाठातून श्रीनिवास ठाणेदार यांनी तरुणांना कोणता सल्ला दिला आहे.

श्रीनिवास ठाणेदार सांगतात की, आजच्या तरुणाईचा विचार केला असता त्यांना एक गोष्ट प्रकर्षाने मांडावीशी वाटते, ती म्हणजे आजच्या तरुणांकडे कौशल्य आहे. प्रतिभा आहे; पण जरासं धाडस आणि आत्मविश्वास हवा. तुम्हाला स्वतःला सिद्ध करण्याच्या संधी आपोआपच येत राहतील. 'विल पावर' ही खरी शक्ती आजच्या तरुणात असली पाहिजे. अशक्य वाटणाऱ्या साऱ्या गोष्टी केवळ (विल पावर) इच्छाशक्ती मिळवून देऊ शकते. आपण प्रामाणिक असले पाहिजे. आपल्याकडे कौशल्य आहे. आपणही हुशार आहात. फक्त आपल्या तरुणात धाडस आणि आत्मविश्वास असला पाहिजे, असे ते म्हणतात. धाडस आणि आत्मविश्वास असेल तर कशाचीही पारवा करू नका असे ते सांगतात. मराठी असल्याचा न्यूनगंड बाळगू नये. अभिमान बाळगावा; परंतु त्याचवेळी जगाच्या चालिरिती शिका अन्य समाज घटकात मिक्स हा, असा सल्ला श्रीनिवास ठाणेदार यांनी तरुणांना दिला आहे.

२. 'ही श्रीची इच्छा' या पाठातून श्रीनिवास ठाणेदार यांचे व्यक्तिचित्र रेखाटा.

'ही श्रीची इच्छा' या पाठाचे लेखक श्रीनिवास ठाणेदार आहेत. त्यांचा जन्म बेळगाव मध्ये झाला. मुंबई विद्यापीठातून त्यांनी रसायनशास्त्र विषयात मास्टर डिग्री प्राप्त केली. १९८२ मध्ये त्यांनी अमेरिकेतल्या युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्रानमधून पॉलिमर केमिस्ट्री या विषयात आचार्य पदवी प्राप्त केली. १९८२ ते १९८४ या काळात त्यांनी पोस्ट डॉक्टरल स्कॉलर म्हणून युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगन येथे काम कार्य केले. १९८४ ला श्रीनिवास ठाणेदारांच्या खऱ्या खाजगी उद्योजक जीवनाची सुरुवात सेंट लुईस येथे पॉलिमर सिंथेसिस केमिस्ट आणि प्रकल्प प्रमुख म्हणून झाली. १९९० मध्ये त्यांनी केमीर ही लहान कंपनी विकत घेतली. जी पुढे मोठी कंपनी म्हणून नावारूपास आली. त्यांनी स्थापन केलेल्या रासायनिक चाचणी प्रयोगशाळा एव्होमेन ऑनालायटीकल सर्व्हिस हिला २०१५-२०१६ मध्ये अमेरिकेच्या सर्वात वेगवान वाढणाऱ्या कंपनीमध्ये महत्त्वपूर्ण स्थान लाभले. त्यांनी सेंट लुईस, मिसुरी येथे तीन माणसे सोबत घेऊन सुरू केलेल्या केमिकल ऑनालायटीकल कंपनीमध्ये आज ४०० च्या वर कर्मचारी कार्यरत आहेत. जिचे वार्षिक उत्पन्न ६३ अब्ज डॉलर्स आहे. त्यांनी वेगवेगळया आठ प्रकारच्या उद्योगांची निर्मिती केली. डबघाईस आलेल्या अनेक उद्योग कंपन्या स्वतः विकत घेऊन आपल्या उत्कृष्ट ज्ञानकौशल्याच्या बळावर त्यांनी यशस्वीपणे नावारूपास आणल्या. या यशामागे त्यांच्या अत्यंत खडतड आयुष्याची पार्श्वभूमी आहे. परिस्थिती समोर न वाकता मोठ्या जिद्दीने परिस्थितीलाच 'श्री'नी वाकवून मराठी समाजासमोर एक नवा प्रेरक आदर्श निर्माण केला.

'ही श्रीची इच्छा' या पाठात श्रीनिवास ठाणेदार सांगतात की, मराठी माणसांमध्ये उद्योग व्यवसाय याकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्वीपेक्षा खूप बदलला आहे. त्याचे ते मनापासून स्वागत नोकरी. नोकरीसुद्धा निमूटपणे करण्याची मानसिकता असणाऱ्या सरळमार्गी मराठी लोकांनी उद्योगात येण्याची भाषा करणे म्हणजे महापाप केल्यासारखं वाटावं, असा तेव्हाचा काळ होता. तसा विचार करणाऱ्या पिढीतील लेखक तेव्हा तरुण होते; पण त्यांच्या मनात काहीतरी करण्याची उर्मी तिला. इच्छाशक्ती प्रचंड तिला. स्वप्न पाहायला आवडत होतं आणि पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी जीवापाड प्रयत्न करण्याची जिद्दही त्यांच्या ठिकाणी होती. त्यांच्या खिशात पैसे नव्हते; पण मनात स्वप्न भरलेली तिला. समोर ध्येय होते. नकार आला की त्याविरुद्ध बंड करणारे मन त्यांना लाभले होते. हे बंड म्हणजे जिद्दीने पुन्हा प्रयत्न करणे होय. जमिनीवरील जबाबदारीची जाणीव आणि त्याचबरोबर आकाशात उंच भरारी मारण्याची त्यांचे स्वप्न होते. अशा अवस्थेकडे तगमग म्हणून न बघता तिच्याशी चक्क मैत्रीच केली आणि पुढचं काही घडत गेलं. शिक्षणासाठी अमेरिकेत जाण्यासाठी धाडस करून केलेले व्हिसा अँप्लिकेशन भिसे तब्बल चार वेळा रिजेक्ट झाले. तरीही चिकाटी सोडली नाही व अखेर

यश मिळाले. आज मागे वळून विचार करताना वाटते की, समजा दोन-तीन वेळा प्रयत्न करून काम होत नाही, म्हणून अमेरिकेत जाण्याचा विचारच रद्द केला असता तर कदाचित श्रीनिवास ठाणेदार नामक कोणी व्यक्ती अमेरिकेत शिकली नसती. तिथे ती व्यक्ती व्यवसाय करू शकली नसती. मिशिगनसारख्या प्रमुख राज्याच्या गव्हर्नर पदाची निवडणूकही लढवू शकली नसती आणि तुमच्यापुढे हे सारे सांगण्यासाठी ती व्यक्ती येऊ शकली नसती असे श्रीनिवास ठाणेदार सांगतात.

श्रीनिवास ठाणेदाराने काही भव्य-दिव्य केले नाही असे ते म्हणतात. तो तर तुमच्यातीलच एक आहे. अमेरिकेसह जगाच्या पाठीवर आपल्या बुद्धिमत्तेच्या-कौशल्याच्या जोरावर व्यावसाय-उद्योगात नवलौकिक केलेले अनेक मराठी बांधव आहेत. त्यांचेही अनुभव थक्क करणारे आहेत. हे सारे जगभरातील मराठी लोकांचा प्रतिनिधी या नात्याने श्रीनिवास ठाणेदार आपल्यापुढे बोलत आहेत.

## संतवाणी
## संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखामेळा, संत तुकाराम

संत ज्ञानेश्वर मराठीतील प्रतिभावंत संत, कवी, आत्मानुभवी योगी व चिदविलासवादी तत्त्वज्ञ म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्रातील भागवत धर्माचे ते प्रवर्तक होते. भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी), अमृतानुभव, चांगदेव पासष्टी व स्फूट अभंगांचा संग्रह असलेली गाथा ही त्यांची ग्रंथसंपदा आहे.

ज्ञानदेवांची अभंगगाथा म्हणजे परमार्थिक भावकविता होय. इतरत्र तत्वचर्चेत आणि चिंतनात मग्न असणारे ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्व अभंगात कमालीचे भावविभोर होते. त्यांचे अभंग आर्त, हळुवार, उत्कट आणि अनावर अशा मनाचे रंगतरंग धारण करतात. अभंग, पदे, गवळणी या निरनिराळया नावांनी ओळखले जाणारे ज्ञानदेवांचे हे अभंग एकाच अनुभवाच्या वेगवेगळया भावछटा व्यक्त करतात.

गुरुकृपेमुळे, त्यांच्या परमाणुभवामुळे मी कसा क्षमा, शांत रूप होत गेलो. प्रपंचापासून मुक्त होऊन मला अलौकिक अनुभूती कशी आली. हा आत्मसंवाद ज्ञानेश्वरांनी प्रस्तुत अभंगातून साधलेला आहे.

अरे अरे ज्ञाना  झालासि पावन ! तुझें तुज ध्यान कळो आलें
तुझा तुचिं देव तुझा तूंची भाव ! फिटला संदेह अनन्यतत्त्वी !
मुरडूनिया मन उपाजलासी चित्ते ! कोठे तुज रितें न दिसे रया !
दीपकी दिपकी मावळल्या ज्योती ! घरभरी वाती शून्य झाल्या !
वृत्तीची निवृत्ती आपणासकट ! अवघेंची वैकुंठ चतुर्भुज !
निवृत्ती परमा अनुभव नेमा !  शांतीपूर्ण क्षमा ज्ञानदेवो !

या अभंगातून संत ज्ञानेश्वरांनी गुरुकृपेचे आपल्या जीवनातील महत्त्व विशद केले आहे. या गुरुकृपेमुळे व परमाणुभवामुळे आपण कशाप्रकारे क्षमा आणि शांतीस्वरूप होतो याचे वर्णन प्रस्तुत अभंगात आले आहे. गुरूच्या कृपेमुळेच प्रपंचापासून मुक्त होऊन अलौकिक अशी अनुभूती संत ज्ञानेश्वरांना प्राप्त झाली आहे. गुरूच्या कृपेमुळे आत्मतृप्तीचा आनंद आहे.

अरे अरे ज्ञाना झालासि पावन  पावन ! तुझें तुज  ध्यान कळो आले ! गुरूच्या कृपादृष्टीमुळे आपण पावन झाल्याची कबुली ज्ञानेश्वरांनी दिली आहे. गुरूच्या कृपादृष्टीमुळेच आपण  स्वतः च स्वतः ला कळलो असे ते म्हणतात. आपण स्वतः स्वतःचा देव झालो आणि त्या देवाचा भाव आपल्या अंगी आला. मनातील संदेह गुरुकृपेमुळे दूर झाले. माझे चित्त आता जागृत झाले आहे असे ते म्हणतात. गुरुकृपामुळे जीवनात काहीच रिते राहत नाही. सद्गुरूंच्या कृपादृष्टीमुळे वृत्तीची संयमता त्यांच्या ठिकाणी आली आहे. सद्गुरु निवृत्तीनाथांमुळेच हे शक्य झाले आहे. संत निवृत्तीनाथांमुळे हा परमाणुभव प्राप्त झाला आहे. प्रपंचापासून दूर राहून ज्ञानेश्वर  क्षमा, शांती रूप झाले आहेत.

अशाप्रकारे गुरुकृपादृष्टीची ही विनवणी ज्ञानेश्वरांनी त्यांचे गुरु आणि वडील बंधू निवृत्तीनाथ यांना अनुलक्षुन केली आहे. गुरुकृपादृष्टी हा या अभंगाचा नमन विषय असला तरी ज्ञानेश्वरांना त्यांच्या सद्गुरूंना वंदन करायचे आहे हे या अभंगातून स्पष्ट होते.

**संत नामदेव**

संत नामदेवांनी सगुण भक्तीत रममाण होऊन भागवत धर्माची पताका पंढरपूरपासून पंजाबपर्यंत नेली. संत नामदेव मराठीतील पहिले भावकवी, चरित्रकार, आत्मचरित्रकार, आख्यानकार म्हणून प्रसिद्ध आहेत. संत नामदेव भागवत धर्माचे पहिले संघटक, प्रसारक आणि किर्तन परंपरेचे प्रवर्तक आहेत. नामदेवांची अभंगवाणी म्हणजे भाववेड्या, उदात्त, प्रसन्न, सोज्वळ आणि निष्पाप अशा व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार आहे. नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी या शब्दात नामदेवांनी आपल्या जीवनकार्याची रूपरेषा सांगितली आहे. अंतर्मुखता, आत्मपरता आणि जिव्हाळा हे त्यांच्या अभंगाचे विशेष आहेत. तीर्थावळी, बाळक्रीडा, ज्ञानेश्वरांची आदी समाधी आणि तीर्थवळी विठ्ठल महात्म्य नाम महिमा इत्यादी अभंग रचनेबरोबरच हिंदीत काव्यरचना केली आहे. संत नामदेव की मुखाबानी म्हणून त्यांची ६१ पदे 'गुरुग्रंथ साहेब' या शिखांच्या पवित्र धर्मग्रंथात समाविष्ट आहेत. ज्याला निंदा-स्तुती शत्रु-मित्र समान वाटतात. तोच भक्त देवाला प्रिय असतो. अशी खऱ्या भक्ताची लक्षणे प्रस्तुत अभंगातून संत नामदेवांनी सांगितली आहे.

निंदिल हे जग सुखे निंदू द्यावे ! सज्जनि क्षोभावे नये बापा
निंदा स्तुति जाला समान पै झाली ! त्याची स्थिती आली समाधीला
शत्रुमित्र ज्याला समसमानत्वे ! तोचि पै देवाते आवडला
माती आणि सोने ज्या भासे समान ! तो एक निधान योगीराज
नामा म्हणे ऐसे भक्त तेने ! तेणे पावन होती लोक तिन्ही

संत नामदेव खऱ्या भक्तांची लक्षणे सांगताना म्हणतात की, कोणी आपली निंदा केली तर त्यांना निंदा करू द्यावे. त्यामुळे त्यांना सुख मिळत असेल तर तसे त्यांना करू द्यावे. त्यांच्यावर सज्जन माणसाप्रमाणे राग धरू नये. निंदा आणि स्तुती आपल्याला दोन्ही प्रिय असली पाहिजे, तोच खरा भक्त होय. अशाच भक्ताचे जीवन सार्थकी लागते असे संत नामदेव म्हणतात. खऱ्या भक्ताने शत्रू आणि मित्र हे दोन्ही समसमान राखावे. ज्याचे असे वर्तन असेल तो भक्त देवाला प्रिय असतो. माती आणि सोने खऱ्या भक्ताला समान वाटत असते. ज्या भक्ताचे वर्तन असे असेल त्या भक्ताला योगत्वाची स्थिती प्राप्त होते. हे सांगून संत नामदेव शेवटी म्हणतात, अशाप्रकारचे वर्तन असणारे भक्तच खऱ्या अर्थाने तिन्ही लोकी पावन होतात.

**संत चोखामेळा**

संत चोखामेळा यांचा जन्म मंगळवेढा येथे झाला. त्यांचा जन्मकाळ उपलब्ध नाही. इ. स. १३३८ हा त्यांचा समाधी काळ असून पंढरपूरच्या महाद्वारासमोर त्यांची समाधी आहे. संत चोखामेळाचे सुमारे ३५० अभंग उपलब्ध आहेत. विठ्ठलाची भक्ती त्यांनी समरसून अनुभवली आणि ते थोर भक्त पदास प्राप्त झाले. चोखोबांच्या अभंगात त्यांच्या दु:खी, कष्टी अंतकरणाचे पडसाद आहेत. त्यातून त्यांच्या हृदयातील तारुण्य जसे स्पष्ट होते, तसेच सामाजिक विषमतेची, उपेक्षेची खंत देखील व्यक्त होताना दिसते. जन्मश्रेष्ठतेपेक्षा कर्मश्रेष्ठत्व हे अधिक मोलाचे आहे. भक्ताचा भक्तिभावच त्याच्या जाती-वर्णापेक्षा श्रेष्ठ असतो. हा समताधिष्ठित मूल्यभाव प्रस्तुत अभंगातून चोखोबांनी सांगितला आहे. आपली भक्ती शुद्ध आहे हे सांगताना चोखोबा निसर्गातील अनेक प्रतिमा वापरतात.

ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा ! काय भुललासी वरलीया रंगा !!१!!
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा ! काय भुललासी वरलीया रंगा !!२ !!
नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगे ! काय भुललासी वरलिया रंगा !!३!!
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा ! काय भुललासी वरलीया रंगा !!४!!

ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा ! काय भुललासी वरलीया रंगा ! या अभंगात संत चोखोबा म्हणतात, ऊस जरी वेडा वाकडा असला तरी त्याचा रस कसा असत नाही. उसाचा रस हा गोडच असतो. वरवरच्या सोंगावर माणसाने भुलू नये. धनुष्याची कमाल जरी वाकडी असली तरी बाण सरळच जातो. नदी जरी वाकडी-तिकडी वाहत असली तरी तिच्यातील पाणी हे इतर पाण्यासारखेच असते. चोखा जरी डोंगा म्हणजेच अस्पृश्य असला तरी त्याची भक्ती शुद्धच आहे. त्यामुळे माणसाने अस्पृश्यता पाळू नये. जात-धर्म हे वरवरचे आहेत. माणूस हा सारखाच आहे, म्हणून माणसांनी खरा मानवता धर्म पळाला पाहिजे असा विचार संत चोखामेळा यांनी ऊस डोंगा परी रस नव्हें डोंगा ! काय भुललासी वरलीया रंगा ! या अभंगाच्या माध्यमातून मांडला आहे.

**संत तुकाराम**

संत तुकाराम यांचे पूर्ण नाव तुकाराम बाल्होबा आंबिले असे आहे. संत तुकाराम महाराज हे महाराष्ट्राच्या संत परंपरेतील शिवकालीन थोर संत आणि प्रतिभासंपन्न कवी म्हणून परिचित आहेत. ज्ञानदेवांनी रचलेल्या भागवत धर्माच्या मंदिरावर कळस होण्याचे भाग्य तुकारामांना लाभले. तुकारामाची अभंगवाणी जनजीवनात आजही रुजलेली आहे. याचे कारण जीवनाच्या अनुभवातून ती आली आहे. 'अनुभव आले अंगा ते या जगा देतसे' अशी ती असल्याने भावजीवनाचे रूप तिला प्राप्त झाले आहे. तुकारामांचे अभंग म्हणजे त्यांच्या भावजीवनाचा आरसाच होय. जिव्हाळा, कळकळ, अनुभवाची रोखठोक अभिव्यक्ती, भाषेचा परखडपणा, सुभाषित्व आणि घरगुती समर्पक दृष्टांत ही त्यांच्या अभंगाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

शिवकालीन मराठी भाषेची सर्व वैशिष्ट्ये त्यांच्या अभंगात आढळतात. तुकारामगाथा, मंत्रगीता, भानुदास चरित्र, सुदाम चरित्र, चोखामेळा चरित्र, काही श्लोक, पदे आणि ओव्या इत्यादी रचना तुकाराम महाराजांच्या नावावर आहे.

गृहस्थाश्रमात नीती तत्वाने आणि मूल्यधिष्ठित जीवन जगणाऱ्या, आचारनिष्ठ व्यक्तीलाही वैरागी माणसासारखे आत्मबळ असे प्राप्त होते हे तुकारामांनी 'जोडूनिया धन उत्तम वेव्हारे ! उदास विचारे वेच करी!' या अभंगाच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे.

जोडूनिया धन उत्तम वेव्हारे ! उदास विचारे वेच करी !
उत्तमची गती तो एक पावेल ! उत्तम भोगीला जीवखाणी
पर उपकारी नेणे परनिंदा ! परस्त्रिया सदा बहिणी माय
भूतदया गायी पशुंचे पाळण ! तान्हेल्याला जीवन वनामाजीं
शांतीरुपे नव्हे कोणाचा वाईट ! वाढवी महत्त्व वडिलांचे
तुका म्हणे हेची आश्रमाचे फळ परमपद बळ वैराग्याचे

जो प्रामाणिकपणे व्यवहार करून पैसा कमवतो. कमावलेला पैसा उदात्त मनाने खर्च करतो. त्याला मरणानंतर उत्तम गती प्राप्त होते. तो उत्तम योनीत जन्माला येतो. जो दुसऱ्यावर उपकार करतो. परिंदा करीत नाही. परस्त्रियांना माता भगिनी प्रमाणे मानतो. भूतदया दाखवून गाई-पशुंचे पालन करतो. तहानलेल्या लोकांसाठी रानावनात पाणपोया निर्माण करतो. ज्याचा स्वभाव शांत आहे. दुसऱ्याचे वाईट व्हावे अशी इच्छा तो करीत नाही. आपल्या उत्तम वर्तणाने आई-वडिलांची किर्ती वाढवतो. तोच खरा गृहस्थाश्रमी होय आणि हेच खरे गृहस्थाश्रमाचे मर्म होय असे तुकाराम महाराज म्हणतात. अशा आदर्श गृहस्थाश्रमाने ईश्वर प्राप्तीसाठी आवश्यक असलेले वैराग्याचे सामर्थ्य माणसाच्या अंगी येते. हे जोडूनिया धन उत्तम वेव्हारे ! उदास विचारे वेच करी! या अभंगाच्या माध्यमातून तुकाराम महाराजांनी सांगितले आहे.

## या भारतात बंधुभाव नित्य वसु दे!
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म विदर्भाच्या अमरावती जिल्ह्यातील यावली या गावी १९०९ मध्ये झाला. त्यांनी १९३५ पासून राष्ट्रवृत्ती व राष्ट्रनिष्ठा जागृत करणाऱ्या स्वरचनीत भजनांच्या आणि भाषणांच्या आधारे मोठ्या प्रमाणात लोकजागृतीचे कार्य केले. आरंभीची काही वर्ष त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यात घालवली. नंतर त्यांनी भारत भ्रमण केले. १९४२ मध्ये चलेजाव चळवळीच्या काळात त्यांनी राष्ट्र जागृती करणाऱ्या भजनांचे कार्यक्रम केले. त्यामुळे त्यांना तुरुंगवासही भोगाव लागला. पुढे त्यांचा गांधीजींशी घनिष्ठ संबंध आला. त्यांनी अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाची आणि श्री गुरुदेव सेवाश्रमाची स्थापना आहे. काही काळ ते अखिल भारतीय साधुसमाजाचे अध्यक्ष होते. याच काळात त्यांनी आपला जपानचा दौरा केला. याशिवाय त्यांनी ठीक ठिकाणी आदर्श ग्राम निर्मितीचे प्रयोग केले. विनोबांच्या भूदान आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. स्वातंत्र्यानंतर निजाम संस्थान भारतात सामील होण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. ग्रामगीता हा त्यांचा संस्मरणीय ग्रंथ होय. याशिवाय त्यांच्या अभंगाचे आणि हिंदी-मराठी भजनावलींचे अनेक संग्रही प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या नावावर सुमारे ४० पुस्तके आहेत. सुबोधता आणि गेयता या गुणांमुळे त्यांचे काव्य जनसामान्यापर्यंत जाऊन पोहोचले. आपल्या देशात  सामाजिक समता, बंधुता एकता लाभावी. कोणीही कुणावर अन्याय करू नये. खल आणि निंदकाच्या मनातही सत्य न्याय वसु द्यावा अशी संविधान मूल्य संस्कृती या भारतात बंधू भाव नित्य वसू दे या अभंगातून साकार व्हावी. ही कविता म्हणजे मानवताधिष्ठित विचारांनी समृद्ध असलेले हे पसायदान आहे.

या भारतात बंधुभाव नित्य वसु दे!<br>
देवरची असा दे !<br>
हे सर्व पंथ-संप्रदाय एक दिसू दे<br>
मतभेद नसू !

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना सशक्त आणि समर्थ भारत घडवायचा होता. त्यासाठी त्यांना भारतीय जनतेतील सर्व मतभेद मिटले पाहिजे असे वाटत होते. तरुणांनी राष्ट्रकार्यात सहभागी झाले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती. त्यामुळे ते म्हणतात की आपल्या या देशात सगळीकडे बंधुभाव वसला पाहिजे. सगळीकडे बंधुभाव वसला पाहिजे. सर्व ठिकाणी बंधुभाव असेल तर दुजाभावाला कुठेही जागा राहणार नाही. आपल्या देशात ज्या विविध प्रकारच्या जाती, धर्म, पंथ यात भेदभाव आहे तो दूर झाला पाहिजे. सर्व पंथ हे एकाच संप्रदायात समाविष्ट झाले पाहिजेत. त्यात कोणताही भेदाभेद असता कामा नये.

नांदोत सुखे गरीब-अमीर एकमतानी !<br>
मग हिंदू असो, ख्रिश्चन, वा हो इस्लामी !<br>
स्वातंत्र्यसुखा या सकला माजी वसू या !<br>
दे देवरची असा दे!

आपल्या देशात जी गरीब-श्रीमंतांची दरी वाढलेली आहे ती कमी होऊन गरीब-श्रीमंत एकाच ठिकाणी चांगल्या पद्धतीने राहिले पाहिजेत. गरिबांना श्रीमंतांचा आदर वाटला पाहिजे. विविध धर्मातील तेढ आपल्या देशातून नष्ट झाले पाहिजेत. हे सर्व भेदभाव नष्ट झाले तर या देशात कोणीही हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख आणि बौद्ध असा भेदभाव करणार नाही.

सकाळास कळो मानवता राष्ट्रभावना !
हो सर्व स्थळी मिळूनी समुदाय प्रार्थना!
उद्योगी तरुण वीर,शीलवान दिसू दे !
दे वरची असा दे !

या अभंगाच्या माध्यमातून तुकडोजी महाराज सांगतात की, आपल्या देशातून जातिभेद आणि धर्मभेद नष्ट झाल्यावर प्रत्येक नागरिकांनी आपले राष्ट्रीय हित जोपासले पाहिजे. त्यांना मानवता धर्म कळला पाहिजे. हीच प्रार्थना सर्वांनी मिळून करायला हवी. आपल्या देशातील तरुण शूर, वीर आणि शीलवान तयार झाले तरच राष्ट्र उभारणीस त्याची मदत होईल त्यामुळे जगात आपल्या देशाचे नाव घेतले जाईल उद्योगी तरुण आपल्या देशात निर्माण व्हायला पाहिजेत असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजज सांगतात

हा जातीभाव विसरुनिया एक हो आम्ही !
अस्पृश्यता समूळ नष्ट होऊ जगातुनी !
खळ निंदका मनी ही सत्य न्याय वसु दे !
देवरची असा दे !

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात की, भारतीय जनतेतील सर्व भेदाभेद दूर झाले पाहिजे. आपण जातीपातीच्या बंधनात अडकून राहता कामा नये. जातीभेद आपल्याला विसरायचा असेल तर या देशातून समोर अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे. निंदकाच्या मनात सुद्धा आपण चांगले विचार निर्माण केले पाहिजे. सत्य आणि न्यायाने आपण सर्वांशी वागले पाहिजे. त्यामुळे खरा भारत निर्माण होण्यास मदत होईल.

सौंदर्य रमो घरघरात स्वर्गीयापरी !
ही नष्ट होऊ दे विपत्ती, भीती बोहरी !
तुकड्यास सदा सर्वदा सेवेत कसू दे !
दे वरची असा दे !

राष्ट्रसंत या भजनाच्या शेवटी सांगतात की, समाजातून जातिभेद, धर्मभेद आणि अस्पृश्यता नष्ट केल्यावर मानवता येईल. त्यामुळे घराघरात सुख आणि सौंदर्य लाभल्याशिवाय राहणार नाही. आपल्या घरातच स्वर्गाची निर्मिती होईल. त्यामुळे आपल्यावर कोणतीही विपत्ती येणार  नाही; म्हणून तुकडोजी महाराज सांगतात की, माझ्या हातून सर्वांची सेवा घडू दे. सर्वांच्या सेवा कार्यात माझा हातभार लागू दे.

## झपूर्झा
## केशवसुत

केशवसुत उर्फ कृष्णाजी केशव दामले यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणून संबोधण्यात येते. इंग्रजी स्फुट कविता वाचून त्यांना काव्यस्फूर्ती झाली तरी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि भावविचारांचा अविष्कार त्यांनी स्वतंत्रपणे केला. त्यांच्या काव्यावर आगरकरांच्या सुधारणा वादाचा प्रभाव जाणवतो. मराठी कवितेत पुढे विकसित झालेल्या बहुतांश काव्यमराठी कवितेत पुढे विकसित झालेल्या बहुतांश काव्य प्रवृत्तीचा उगम केशवसुतांच्या काव्यातच आढळून येतो प्रेममराठी कवितेत पुढे विकसित झालेल्या बहुतांश काव्य प्रवृत्तीचा उगम केशवसुतांच्या काव्यातच आढळून येतो प्रेमभावना निसर्गप्रेम गुडगुंजन सामान्य गोष्टीतही सौंदर्य शोधण्याची प्रवृत्ती सामाजिक क्रांतीचे आवाहन त्यांच्या काव्यातून आढळते आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीने त्यांनी मराठी कवितेत आमूलाग्रह परिवर्तन घडवून आणले नविनृत्ये सुनीता सरकार नवा काव्यप्रकारआणि आणि नव्या आशियाला अनुकूल अशी काव्यची वेगवेगळी भाषा करण्याची श्रेयही त्यांना देण्यात येते

'झपूर्झा' ही कविताता कलावंतांच्या कलावंतांच्या मानसिक सुखदुःखाचे वर्णन करणारी आणी. सुखकारक आणि निर्माणनिर्माण तंद्रीचे ते त्यातून वर्णन करतात. या निर्मितीच्या उत्कट अवस्थेत देहभान विसरणे स्वाभाविकच आहे. रूढ मानसिक आणि शारीरिक संवेदनांचा विलय होऊन निर्मिती-विषयाशी झालेली एकरूपता कवीने झपूर्झा या कवितेतून वर्णन केली आहे.

केशवसुतांची झपूर्झा ही कविता निर्माणक्षम कलावंतांच्या मानसिक सुखदुःखाचे वर्णन करणारी कविता आहे. यात केशवसुत म्हणतात,

हर्षखेद मावळले
हास्य निमाले ! अश्रू पळाले
कंटक शल्ये बोथटली,
मकमालीची लव वठली;
काही न दिसे दृष्टीला
प्रकाश गेला ! तिमिर हरपला;
काय म्हणावे या स्थितीला
झपूर्झा, गडे झपूर्झा

आपल्याला ज्यात काही नाही असे वाटते त्यातून महात्मे जगाच्या कल्याणाच्या चिजा बाहेर काढतात. त्यामुळे केशव सुत या कवितेत म्हणतात, हजारो लोकातून एखादा प्रतिभावंत निर्माण होतो. त्या माध्यमातून कविला ही कविता सुचली आहे.

हर्षशोक हे ज्या सगळे,
त्या काय कळे ! त्या काय वळे?
हसतील जरी ते आम्हाला,
भय न धरू हे वदण्याला
व्यर्थी अधिकची अर्थ वसे
तो त्यास दिसे ! ज्या म्हणती पिसे;
त्या अर्थाचे बोल कसे
झपूर्झा, गडे झपूर्झा

या निर्मितीच्या उत्कट अवस्थेत देहभान विसरणे स्वभाविक आहे. रूढ मानसिक आणि शारीरिक संवेदनाचा विलय होऊन निर्मिती विषयाशी झालेली एकरूपता केशवसुतांनी वर्णन केली आहे. हर्षशोकात गुराफटलेल्या गद्यग्रंथित जगाचा उपहास

ज्ञाताच्या कुंपणावरून,
धीरत्व धरून ! उड्डाण करून
चिदघनचपला ही जाते,
नाचत तेथे चकचकते;
अंधुक आकृती तिस दिसती
त्या गाताती ! निगूढ गीती
त्या गीतींचे ध्वनी निघती
झपूर्झा, गडे झपूर्झा

ज्ञाताच्या आधारावर अज्ञात प्रदेशात जाऊन चककणाऱ्या आणि आपल्या अपुऱ्या प्रकाशात भासमान होणाऱ्या आकृतींचा दिव्य साक्षात्कार करून घेणाऱ्या प्रतिभेचे कार्य दिग्दर्शित करतात. ही उत्कट अवस्था नवनिर्मितीची आहे. त्यामुळे पुढे केशवसुत म्हणतात,

नांगरल्याविण भुई बरी
असे कितीतरी ! पण शेतकरी
सनदी तेथे कोण वद
हजारांतुनी एखादा !
तरी न तेथूनी वनमाला
आणायला ! अटक तुम्हाला
मात्र गात हा मंत्र चला
झपूर्झा, गडे झपूर्झा

हजारो लोकांतून एखादाच प्रतिभावंत निर्माण होतो. केशवसुतांनी मराठी काव्यविश्वाला प्रतिभा संपन्न केले आहे. कविता आणि कवी या कवितेपासून प्रतिभा या कविते पर्यंत त्यांनी सतत 22 वर्ष कविता लेखन केले आहे. काव्य, कला आणि प्रतिभा यांची स्वरूपे आणि कार्य, सौंदर्यनिर्मितीच्या प्रांतातले विविध अनुभव, विविध क्षेत्रात होणारा प्रतिभवंतांच्या सामर्थ्यांचा साक्षात्कार या सर्वांवर दीड तपात त्यांनी कविता लिहिल्या.

पुरुषाशी त्या रम्य अति
नित्य प्रकृती क्रीडा करिती
स्वर संगम त्या क्रिडांचा
ओळखणे हा ज्ञानाचा
हेतू तयाची सुंदरता
व्हाया चित्ता ! प्रत ती ज्ञाता
वाडेकोडे गा आता
झपूर्झा, गडे झपूर्झा

ही नवनिर्मितीची प्रक्रिया आहे. अशा ठिकाणी नावानिर्मितीसाठी प्रकृती पुरुषाशी सतत क्रीडा करते. त्या क्रीडांचे सौंदर्य ज्ञात करून घेण्यासाठी त्या क्रीडांचा स्वर संगम ओळखणे हा ज्ञाताचा हेतू आहेआणि ही

क्रीडा स्वाभाव स्वाभाविकपणे निसर्गातच अधिक तनमयतेने घडतेआणि ही क्रीडा स्वाभाविकपणे निसर्गातच अधिक तनमयतेने घडतेयाविषयी केशवसुत सांगतात.

सूर्यचंद्र आणिक तारे
नाचत सारे ! हे प्रेमभरे
खुडीत खपुष्पे फिरती जिथे
आहे जर जाणे तेथे
धरा जरा नि:संगपणा
मरा फिरके ! मारा गिरके
नाचत गुंगत म्हणा, म्हणा
झपूर्झा, गडे झपूर्झा

अशा प्रकारे ही क्रीडा निसर्गाच्या स्वरूपात तनमयतेने घडत आहे म्हणून ज्या ठिकाणी सूर्य चंद्र तारे प्रेमभराने नाचत आकाशापुढे तोडतातितिथे जायचे असेल तर निसर्ग हवा आणि तशी तंद्री प्राप्त करून द्याअसा सहज सुंदर आत्मसाक्षात का युक्त संदेशही केशवसुतांनीअनेकांना या कवितेतील आशय आध्यात्मिक स्वरूपाचा वाटतो

अशाप्रकारे इंग्रजीतील कवितातून दिसणारा सौंदर्यवादी दृष्टिकोन केशवसुतांनी मराठीत प्रथमच आणला. कवीची प्रतिभा स्वतंत्र असावी. कोणत्याही प्रभावाशिवाय असे ते म्हणतात. प्रतिभेने याच प्रकारे काव्य रचावे, असेच रचावे असे तिला आपण आदेश देऊ नये असे केशवसुतांचे म्हणणे होते.  वड्‌र्सवर्थ, शेली किड्स यासारख्या इंग्रजी कवींच्या कवितांचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव होता. इंग्रजी काव्यातील चौदा ओळींचा सॉनेट हा काव्यप्रकार सुनीत भावाने त्यांनी मराठीत लोकप्रिय केला.

**मना बन दगड**
**गोविंद विनायक करंदीकर**

गोविंद विनायक करंदीकर यांचे स्वेदगंगा, मृदगंध, जातक, विरुपिका हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. जाणिवेच्या विविध स्तरावरील भावानुभव करंदीकर समर्थपणे व्यक्त करतात. त्यामुळेच प्रचारापासून प्रतीकापर्यंत त्यांच्या काव्याची विविध स्वरूपे आहेत. विक्षिप्त आडमाप प्रतिमा, बेफिकीर रचना, शब्द वाकवण्याची लकब आणि निडर प्रयोगशीलता या वैशिष्ट्यांमुळे करंदीकरांची कविता उठून दिसते. तिच्यात केशवसुती कडवेपणासोबतच वैचारिकतेचा धर्मही आहे. सामाजिक अन्यायाचे भेदक दर्शन घडविणाऱ्या आणि दलित शोषितांविषयी सहानुभूती व्यक्त करणाऱ्या करंदीकरांच्या कवितेत अंती जीवन सफलच होणार आहे, अशी श्रद्धाही आहे. याच काव्यवैशिष्ट्यांमुळे करंदीकरांना ज्ञानपीठ हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

करंदीकरांची माझ्या मना बन दगड कविता त्यांच्या मृदगंध या कविता सांग्रहातून घेतली आहे. रूढ कळवळा टाकून सामाजिक वास्तवाशी सहकंप होण्याची विजिगीशा करंदीकरांना काव्यनिर्मितीच्या प्रारंभापासूनच होती. श्रमिकांची दाहक वंचना, भांडवलदारांचा अन्याय, शोषण, संघर्ष, क्रांती यातच त्यांची काव्यप्रतिभा अडकून पडली नाही. सामाजिक, सांस्कृतिक विषमता, यंत्र युगातील आर्थिक पिळ्याने त्रासलेले सामाजिक जीवन त्यांच्या चिंतनाचा विषय झाले. त्यातून काही वास्तव दर्शनाच्या तर कधी चिंतनाच्या पातळीवर तर कधी उपासगर्भ शैली तर कधी क्रांतदर्श शैलीत अनेक समाजचित्रणे आकारास आली. या दृष्टीने ही कविता महत्त्वाची आहे. माणूस आणि विश्व, माणूस आणि मन, माणूस आणि समाज या त्रिस्तरावरील ताणतणाव या कवितेतून प्रकट झाला आहे.

हा रस्ता अटळ आहे!
अन्नाशिवाय, कपड्या शिवाय,
ज्ञाना शिवाय, माना शिवाय
कुडकुडणारे हे जीव
पाहू नको ! डोळे शिव !
नको पाहू जिणे भकास
ऐन रात्री होतील भास
छातीमध्ये अडेल श्वास
विसर यांना, दाब कढ
माझ्या मना बन दगड

या ओळीतून विषमतेचे दर्शन कवीने घडविले आहे. कवी स्वतः ला म्हणतो, हा रस्ता अटळ आहे, म्हणजे तुला जगावे लागणार आहे. जीवन जगताना अन्ना शिवाय तडफणारे लोक तुला दिसतील, भूक बळी दिसेल, कपड्या शिवाय राहणारे दिसतील. परंतु त्यांच्याकडे पाहू नकोस. डोळयांवर पट्टी बांध, डोळे शिवून घे. त्यांचे भकास जगणे पाहू नकोस आणि पाहिले तर तुला झोप येणार नाही. रात्री भास होतील. छाती मध्ये श्वास अडेल. त्यामुळे मनात आलेली कढ दाब त्यांना विसर आणि दगड बन

हा रस्ता अटळ आहे!
ऐ कु नको आक्रोश
तुझ्या गळयाला पडेल शोष
काना वरती हात धर
त्यातूनही येतील स्वर
म्हणून म्हणतो ओत शिसे
संभाळ संभाळ लागेल पिसे

रडणाऱ्या रडशील किती?
झुरणाऱ्या झुरशील किती?
पिचणाऱ्या पिचशील किती?
ऐ कु नको असला टाहो
माझ्या मना दगड हो!

जगणे अटळ आहे. त्यामुळे आजूबाजूच्या लोकांचा आक्रोश ऐकलास तर गळयाला शोष पडेल. कानावरती हात धर, नाहीतर कानात शिसे ओत. स्वत: ला सांभाळ, नाहीतर वेड लागेल. तु किती रडशील? झुरणाऱ्या किती झुरशील? पिचणाऱ्या किती पिचशील ? म्हणून असला टाहो ऐकू नकोस. तु दगड हो

हा रस्ता अटळ आहे!
येथेच असतात निशाचर
जागोजाग रस्त्यावर
असतात नाचत काळोखात
हसतात विचकून काळे दात
आणि म्हणतात कर हिंमत
आत्मा विक , उचल किंमत !
माणूस मिथ्या सोने सत्य
स्मरा त्याला स्मरा नित्य
भिशील ऐकून असले वेद
बन दगड नको खेद!

हा रस्ता अटळ आहे. येथे फसवणारे लोक तुला भेटतील जागोजागी रस्त्यावर अध्यात्माचा बाजार मांडणारे भेटतील रात्रीच्या काळोखात चोऱ्या करणारेही भेटतील. काळोखात काळे दात विचकून हसत म्हणतात, कर हिंमत आत्मा विक, उचल किंमत, माणूस मिथ्या आणि सोने सत्य आहे. म्हणजेच माणसापेक्षा पैशाला, संपत्तीला किंमत देणारे जागोजाग भेटतात. पैशासाठी काहीही करणारे, माणसांना मारणारेही भेटतात. अशा लोकांचे तत्त्वज्ञान ऐकून तू घाबरशील. त्यामुळे तिकडे लक्ष न देता तू दगड बन.

## पाऊस
## माणिक सिताराम गोडघाटे

जीवन-मृत्यूचा शोध घेणारा नवकवी म्हणून माणिक सिताराम गोडघाटे मराठी साहित्यविश्वाला परिचित आहेत. युगवानी संदर्भ या वांग्मय नियतकालिकाचे यशस्वी संपादन म्हणून त्यांनी लौकिक मिळविला आहे. संध्याकाळच्या कविता, चंद्र माधवीचे प्रदेश, राजपुत्र आणि डार्लिंग इत्यादी त्यांचे कविता संग्रह प्रकाशित प्रसिद्ध आहेत. चर्चबेल आणि मितवा हे ललित लेखसंग्रह ही प्रसिद्ध आहेत. त्यांनी साहित्य अकादमी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळ व विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य म्हणून मोलाची कामगिरी केली. 'राजराजपुत्र आणि डार्लिंग' या कवितासंग्रहाला उत्कृष्ट काव्य निर्मितीचा तर 'मितवाला' १९८९ चा दमानी पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या 'वाऱ्याने हलते रान' या पुस्तकाला २०११ चा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या इतरही अनेक ग्रंथांना महाराष्ट्र शासनाने पुरस्कार देऊन गौरविले आहे.

ग्रेसांची कविता ही स्वप्नस्थ अवस्थेतील कविता आहे. त्यांच्या कवितेत सुरुवातीला सायंकालीन गुढ भावार्त मनस्थितीचा व्याकुळ सूर लागला आहे. येथील प्रतिमासृष्टी लोकजीवनातून आणि भारतीय सांस्कृतिक संचितातून साकार झाली आहे. वेदना स्वीकारातील आत्मसंपन्नता येथे ग्रेस व्यक्त करतात. ग्रेसांची बहुतांश कविता आई आणि अंगाई यांच्या अप्राप्तीने उडालेला दुःखाचा भडका जागोजाग व्यक्त करते. संदिग्धता हा महत्त्वाचा सौंदर्यवादी कवितेचा विशेष ग्रेसांच्या कवितेत पूर्णपणे दिसतो. त्यांची 'पाऊस' ही कविता 'संध्याकाळच्या कविता' या संग्रहातून घेतली आहे. या कवितेत डोळयात उतरलेल्या पापण्यावर फिरणारे ग्रेसांचे डोळे हे या जगातले वाटत नाही. या दुःखाच्या महाकवीचे दुःख हेही आपल्या वाट्याला येणाऱ्या सर्वसामान्यासारखे दुःख नाही. त्या दुःखाचा पोत, त्याचा स्तर, त्याची खोली ही जगावेगळी आहे. अशा दुःखाच्या मंद सुराने जागलेल्या कवी मनात निर्माण झालेल्या व्यामिश्र भाव भावनांचे तरंग त्यांच्या 'पाऊस' या कवितेतून प्रत्ययास येते.

पाऊस कधीचा पडतो
झाडांची हलती पाने
हलकेच जाग मज आली
दुःखाच्या मंद सुराने

कधीपासून पाऊस पडत आहे आणि त्या पावसामुळे झाडांची पाने हलत आहेत. त्यामुळे पानांचा सळसळ असा आवाज येत आहे. अशा या वातावरणात एक स्त्री विरहाच्या दु:खाने तळमळत आहे. तिला अशा वातावरणात झोप लागली होती. परंतु दुःखाच्या मंद सुराने तिला हलकीच जाग आली आहे.

डोळयात उतरले पाणी
पाण्यावर डोळे फिरती
रक्ताचा उडला पारा......
या नितळ उतरणीवरती

अशा वेळी स्त्रीच्या डोळयात पाणी आले. ती ओलावलेल्या आणि पाणावलेल्या डोळयांनी उदास होऊन पाहत आहे. तिच्या या स्थितीमुळे तिचा पारा वाढला आहे. तिला राग आला आहे. ती वैतागली आहे. पण ती आपल्या भावना मोकळया करत नाही. तिने आपल्या भावना व्यक्त केल्या नाहीत. मात्र ती संतापाने वैतागून गेली आहे; कारण तिचे संपूर्ण जीवन दु:खमय झाले आहे.

पेटून कशी उजळेना
ही शुक्र फुलांची ज्वाला
ताऱ्यांच्या प्रहारपाशी
पाऊस असा कोसळला

अशा या स्त्रीच्या मनातील भावनिक संघर्ष व्यक्त करण्याचा प्रयत्न कवीने केला आहे. तिच्या मनातील भावना पेटल्या आहेत. पण त्याचा ती काहीच देखावा न करता नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न करत आहे.

संदिग्ध घराच्या ओळी
आकाश ढवळतो वारा
माझ्याच किनाऱ्यावरती
लाटांचा आज पहारा

अशाप्रकारे स्त्रीच्या मनात दु:खाचे वास्तव शिल्लक राहिले आहे. घराच्या ओळीतून वारा ज्याप्रमाणे बेभान होऊन वाहतो आणि संपूर्ण आकाश ढवळून काढत असतो, त्याप्रमाणे तिचे संपूर्ण मन ढवळून निघाले आहे. सागरासारख्या जीवनात उचंबळून येणाऱ्या लाटा तिच्यावर सक्त पहारा ठेऊन आहेत. तिच्या एकाकीपणाच्या भावना उफाळून येत आहेत. मात्र आपल्या भावना ती कुणाजवळ व्यक्त करू शकत नाही. तिच्या दु:खाला ती वाट मोकळी करून देऊ शकत नाही. 'पाऊस' या कवितेतून निसर्गाच्या प्रतिमेतून व्यक्त झालेले स्त्रीचे दु:ख भावनिक पातळीवर येऊन पोहचते. यातून एका स्त्रीच्या मनातील वेदना व्यक्त झाल्या आहेत. या वेदनांमुळे स्त्रीच्या मनातील भावनिक संघर्ष 'पाऊस' या कवितेतून कवीने व्यक्त केला आहे.

## व्यवाहरिक मराठी
## प्रसार माध्यमांसाठी लेखन

१. आकाशवाणीवर शालेय कार्यक्रमाचे आयोजन कसे केले जाते?

शालेय कार्यक्रमाचे प्रसारण हा आकाशवाणीवरील प्रसारणाचा महत्त्वाचा भाग आहे. भारतासारख्या अवाढव्य देशात शालेय मिश्रणाला पूरक असे मौलिक कार्य या कार्यक्रमाद्वारे साध्य होऊ शकते. शिक्षकांनी वर्गात रेडिओ लावून विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे समूहिक श्रवण करावे अशी अपेक्षा असते. शालेय कार्यक्रमाच्या श्रोतृवृंदांचा वयोगट ७ ते १४ असा गृहीत धरला जातो. त्यामुळे या वयोगटातील मुला-मुलींना आकर्षित करू शकेल असे कार्यक्रमाचे स्वरूप ठेवावे लागते. त्यामुळे भाषणाचे प्रमाण जवळजवळ नगण्य असते. त्याऐवजी संवाद, मुलाखती, नाटिका आणि रूपक अशा कार्यक्रमावर भर दिला जातो. मुलांची आकलनशक्ती आणि ज्ञानपातळी लक्षात घेऊन कार्यक्रमाचे लेखन केले जाते. शैक्षणिक कार्यक्रमासाठी पाठलेखन, संवाद, नाट्यीकरण यासाठी लेखन कार्यशाळा आयोजित केला जातात. रेडिओसाठी कार्यक्रम लिहिण्यासाठी शिक्षकांना आकाशवाणी तर्फे कार्यशाळा घेऊन प्रशिक्षण दिले जाते. शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये तज्ञांचे भाषण ते कधी कधी  सोदाहरणसुद्धा असते. प्रसंगाचे नाट्यकरण विद्यार्थ्यांशी संवाद, प्रश्नमंजुषा, अभ्यासक्रमावर आधारित लघुनाटिका या स्वरूपात प्रसारण केले.

२. आकाशवाणीवर महिलांसाठी कोणकोणते कार्यक्रम सादर केले जातात?

आकाशवाणीवरून महिलांसाठी विशेष कार्यक्रम सादर केले जातात. त्यात महिलांच्या शारीरिक व मानसिक समस्या, कौटुंबिक परिस्थितीत निर्माण होणारे तणाव, मुलांचे संगोपन, सकस आहार, घरगुती औषधे, गृह उद्योग, पाककला, व्यक्तिमत्व घडवून, महिला स्वयंरोजगार आणि सक्षमीकरण इत्यादी विविध विषय समाविष्ट करण्यात येतात. शहरी भागात नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घरातील व समाजातील व्यवहारात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्याबाबतही मार्गदर्शन केले जाते. याखेरीज महिलाविषयक कायदे, महिलांचे हक्क, महिला कल्याणसाठी शासनाने आखलेल्या योजना यांचीही माहिती दिली जाते. या कार्यक्रमातील भाषा महिलांना आपली वाटेल अशी असते. महिलांच्या आकाशवाणीवरील कार्यक्रमात महिलांचे विविध प्रश्न, त्यांच्या समस्या याविषयी विचार, चर्चा, संवाद प्रसारित केले जातात. महिलांच्या आरोग्यविषयक समस्याचे निराकरण व्हावे म्हणून स्त्रीरोग तज्ञ डॉक्टरांकडून माहितीचे प्रसारण केले जाते. साहित्यिक महिलांना आपली कथा, कविता, नाटिका प्रसारित करून आकाशवाणीच्या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी असते.

३. आकाशवाणी वरून युवकांसाठी कोणकोणते कार्यक्रम सादर केले जातात?

आकाशवाणी वरून युवकांसाठी 'युवावाणी' हा विशेष कार्यक्रम प्रसारित करण्यात येतो. युवकांसाठी युवकांनी सादर केलेला 'युवावाणी' कार्यक्रम आकाशवाणीच्या सर्व क्षेत्रीय, प्रादेशिक आणि स्थानिक केंद्रांवरून प्रसारित केला जातो. देशातील ६०% नागरिक हे २० वर्षाच्या आतले आहेत ही बाब लक्षात घेऊन अशा ६०% नागरिकांची ज्ञान मनोरंजनाची गरज पूर्ण करण्याच्या उद्देशाने आकाशवाणी तर्फे 'युवावाणी' हा कार्यक्रम सुरू करण्यात आलाआहे. 'युवावाणी' कार्यक्रमात भाग घेण्यासाठी वयोमर्यादा १६ ते ३० वर्षे इतकी आहे. युवकांनी कार्यक्रमात स्वतःचे मनोगत मांडावे ही यामागची संकल्पना आहे. युवक वर्गाचे राष्ट्रनिर्माणातील महत्त्व लक्षात घेऊन हा कार्यक्रम प्रत्येक केंद्रावरून रोज अर्धा तास याप्रमाणे प्रसारित केला जातो. यामध्ये प्रामुख्याने युवकांच्या वेगवेगळया समस्या, व्यवसाय मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षेची तयारी, व्यक्तिमत्त्व विकास, उद्योजकता विकास, विविध क्रीडा स्पर्धा, साहसी उपक्रम, सामाजिक बांधिलकी

विकसित करण्याच्या दृष्टीने आखलेले कार्यक्रम यांना प्राधान्य देण्यात येते. गिर्यारोहण, जलतरण, मुष्टीयुद्ध ज्यूडो-कराटे, सायकल शर्यत, वक्तृत्व, नाट्याभिनय, गायन-वादन स्पर्धा हे विषयही युवावाणीत स्वाभाविकपणे वरचेवर येतात. तारुण्यातील जाम, उत्साह, आवेश, अन्यायाबद्दलची चीड, आयुष्यातील एकंदर ताजेपणा हा या कार्यक्रमामधून प्रतिबिंबित व्हावा अशी अपेक्षाा असते.

४. आकाशवाणी वरील बातमीचे लेखन कशा पद्धतीने केले जाते?

रेडिओवरील भाषण हे लिहून काढलेले असले तरी ते निबंधवजा असून चालत नाही. ते संभाषणवजा अनौपचारिक शैलीतील असावे लागते. रेडिओच्या श्रोत्यांची मनस्थिती एवढी स्वागतशील असेलच असे नाही. एकदा गेलेला शब्द, एखाद्या वाक्यांश पुन्हा ऐकू येण्याची सोय नसते. त्यामुळे रेडिओवरील भाषा अतिशय सोपी असावी. त्यात अवघड, कृत्रिम आणि अलंकारिक वाक्यरचना असू नये. सर्वसाधारण लेखात खालीलप्रमाणे, वरीलप्रमाणे, मागीलप्रमाणे असे संकेत चालू शकतात. रेडिओत ते चालत नाही; कारण रेडीवरील भाषण हे डोळयाऐवजी कानातून मनात उतरत असते. अशा प्रसंगी त्या ठिकाणी 'सांगायचे झाल्यास' या संबोधनाचा वापर केला जातो. लिखित मजकुरात 'व' सारखे उभयान्वयी अव्यय चालू शकते; परंतु रेडिओ, दूरदर्शनवर 'आणि' हे अधिक ठसठशीत स्पष्ट अव्यय वापरणे योग्य असते. लेखन करताना भाषा ही दैनंदिन वापरातील, व्यवहारातील असावी पण ती उथळ किंवा असभ्य असता कामा नये. कितीही अवघड विषय असला तरी तो सोप्या बोलीत, परिचित शब्दांमध्येच मांडावा लागतो.

लेखन करताना 'असे', 'तसे', 'घेणे', 'देणे' ऐवजी 'असं', 'तसं', 'घेणं', 'देणं' असे शब्द वापरावे. त्याचप्रमाणे 'केले', 'गेले' ऐवजी 'केलं' 'गेलं', 'करण्यात आलं' असे बोली भाषेतील शब्द वापरले गेले भाषणाचे. भाषणाचे स्क्रिप्ट किंवा संहिता लिहिताना काही बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये भाषण हे कागदाच्या एकाच बाजूने लिहिले पाहिजे. कागदाच्या कागदाच्या शेवटी भाषणातील वाक्य त्याच पानावर पूर्ण झाले पाहिजे. अर्धेवाक्य दुसऱ्या पानावर जाता कामा नये. त्यामुळे वाक्य बोलताना विलंब होतो. लिहिलेल्या भाषणाची भाषा ही पुस्तके पतीने. आपण बोलताना जी भाषा नेहमी वापरतो तीच भाषा भाषणासाठी जास्त समर्पक ठरते. लेखनात अवघड उच्चार असलेले असाच, त्याचप्रमाणे महत्त्वाचे वाक्यांश अधोरेखित करावे.

सल्पविराम, पूर्णविराम, उद्गारचिन्ह आणि प्रश्नचिन्ह इत्यादी चिन्हेही स्पष्ट लिहावेत. आकाशवाणीवरून उच्चारला गेलेला शब्द हा बाणासारखा असतो. एकदा बाण सुटला की तो परत येत नाही. रेडिओवरील प्रसारित झालेला शब्दही असाच अवकाशात निघून जातो. लिखित मजकूर आपण पुन्हा पुन्हा वाचू शकतो. रेडिओवरील शब्द पुन्हा पुन्हा ऐकता येत नाही. रेडिओसाठी लेखन करताना कार्यक्रम किती अवधीचा आहे. त्यानुसार लिखाणाचे नियोजन करावे लागते. रेडिओवरील भाषणाचा अवधी साधारणपणे १० मिनिटांचा असतो तर वाचनाचा वेग मिनिटाला १०० ते १२० शब्द एवढा असतो. याचाच अर्थ १००० ते १२०० बसेल असे लिखाण असावे लागते.

## शुद्धलेखन

शुद्धलेखणाचे नियम

**अनुस्वार**

१. स्पष्ट उच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षकबिंदू द्यावा.

उदाहरणार्थ
गुलकंद, चिंच, तंटा, निबंध, आंबा

२. य, र, ल, व, श, ष, स, ह यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वाराबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा.

उदाहरणार्थ
सिंह, संयम, मांस

३. नामाच्या व सर्वनामाच्या अनेकवचनी सामान्य रूपावर विभक्ती प्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावतानाा अनुस्वार द्यावा.

उदाहरणार्थ
लोकांना, मुलांनी, तुम्हांस, लोकांसमोर, घरांपुढे

नामांच्या आणि सर्वनामांच्या अनेक वचनाच्या वेळी विभक्ती प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वारांचा उच्चार केव्हा स्पष्ट तर केव्हा अस्पष्ट होतो. अशावेळी उच्चार स्पष्ट की अस्पष्ट असा भेद न करता या नामांच्या आणि सर्वनामांच्या सामान्य रूपावर अनुस्वार द्यावा.

उदाहरणार्थ

मुलास (एकवचन)  मुलांस (अनेक वचन)
मुलाला (एकवचन) मुलांला, मुलांना (अनेक वचन)
मुलाशी (एक वचन) मुलांशी (अनेक वचन)
गावाहून (एक वचन) गावांहून (अनेकवचन)

हा अनुस्वार आदरार्थी अनेक वचनाच्या वेळीही द्यावा.

उदाहरणार्थ
गोविंदरावांना, गांधीजींची झोपडी, राष्ट्रपतींचे भाषण, आपणांस

द्विवृत्त व अभ्यस्त शब्दांच्या बाबतीत अनेकवचनाच्यावेळी त्यातील उत्तरपदाच्या सामान्य रूपावर अनुस्वार द्यावा.

उदाहरणार्थ

खेड्यापाड्यांत, घराघरांतून, पोरासोरांना, रस्त्यारस्त्यांत

**ऱ्हस्व-दीर्घ**

४. मराठीतील तत्सम इ-कारांत आणि उ-कारांत शब्द दीर्घांत लिहावे.

उदाहरणार्थ
कवी, मती, गती, गुरू इत्यादी शब्दांच्या अंती येणारा इकार व उकार दीर्घ लिहावा.

परंतु अद्यापी तथापि इती यथामती यासारखी तत्सम अव्यये सर्वत्र ऱ्हस्वान्तच लिहावी. तसेच आणि व नि ही मराठीतील दोन अव्यये अव्यय ऱ्हस्वान्तच लिहावी.

५. दीर्घ ई-कारांत व ऊ-कारांत शब्दातील उपांत्य इ-कार व उ-कार ऱ्हस्व लिहावे.

उदाहरणार्थ
गरिबी, माहिती, हुतुतू, सुरू

अपवाद
नीती, भीती, रिती, कीर्ती इत्यादी दीर्घांत झालेले तत्सम शब्द.

मराठीमध्ये शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ असेल तर त्याचा उपांत्य इ-कार व ऱ्हस्व लिहावा.

उदाहरणार्थ
विळी, चिठी, सुगी, सुटी, सुरू, पिळू. हाच नियम आकारांत एकारान्त व उकारांत शब्दांनाही लागू आहे.

६. अ-कारांत शब्दाचे उपांत्य इ-कार व उ-कार दीर्घ लिहावे.

उदाहरणार्थ
गरीब, वकील, वीट, सून, वसूल

अपवाद
ऱ्हस्वोपांत अ-कारांत तत्सम शब्द.
गुण विष मधुर प्रचुर

मराठीमध्ये अकारांत शब्दातील उपांत्य इ-कार व उ-कार दीर्घ असतो.

नीट, तीट, सून, ऊस, जमीन, घेऊन पण हा नियम विष मधुर प्रचूर यासारख्या तत्सम शब्दांना लागू नाही. म्हणजेच संस्कृतातून आलेल्या अकारांत शब्दाचे उपांत्य अक्षर ऱ्हस्व  इ-कारांत किंवा उ-कारांत असल्यास ते मुळाप्रमाणेच ठेवावे. दीर्घ करू नये. गुण विष यासारखे शब्द गूण, वीष असे लिहू नयेत.

७. उपांत्य दीर्घ ई-उ असलेल्या शब्दांचा उपांत्य ई-कार ऊ-कार उभयवचनी सामान्य रूपाच्या वेळी ऱ्हस्व लिहावा.

उदाहरणार्थ
गरिबास, वकिलांना, सुनेला, वसुलाची, नागपुरास

८. पूर हा ग्रामवाचक शब्द कोणत्याही ग्राम नावास लावताना दीर्घोपांत लिहावा.

उदाहरणार्थ
नागपूर, संबळपूर, तारापूर

९. हळूहळू, मुळूमुळू, खुटूखुटू या शब्दातील दुसरा स्वर व चौथा स्वर दीर्घ लिहावा.

# वस्तुनिष्ठ प्रश्नसंच

**उमाइ नमस्कारें आगुंठा लावणे : म्हाइंभट**

१) उमाइ नमस्कारें आगुंठा लावणे या पाठाचे लेखक कोण आहेत?

उत्तर :- म्हाइंभट

२) म्हाइंभटाचा जन्म कोणत्या शतकात झाला?

उत्तर :- तेराव्या शतकात

३) लीळा चरित्र हा महत्त्वाचा ग्रंथ कोणी लिहिला?

उत्तर : म्हाइंभट

४) मराठी भाषेतील आद्य गद्य चरित्रकाराचा मान कोणाला दिला जातो

उत्तर : म्हाइंभट

५) 'उमाइनमस्कारें आगुंठा लावणे' ही लीळा चरित्रामधील निवडक कथांचे संकलन केलेल्या कोणत्या ग्रंथातून घेतली आहे?

उत्तर : कथा मौक्तिके

६) कथा मौक्तिके या ग्रंथातील लीळाचे संकलन कोणी केले आहे?

उत्तर : प्रा. राजेंद्र रंगराव राऊत

७) 'उमाइनमस्कारें आगुंठा लावणे' या लीळेत गोसावी असा उल्लेख कोणाचा आला आहे?

उत्तर : नागदेवाचार्य

८) 'उमाइनमस्कारें आगुंठा लावणे' या लीळेत उमाइसा कोठे बसली होती?

उत्तर : दाराजवळ कोपऱ्यात

९)  'उमाइनमस्कारें आगुंठा लावणे' या लीळेत वानरेसा असा उल्लेख कोणाचा आला आहे?

उत्तर : नागदेवाचार्य

१०) 'उमाइनमस्कारें आगुंठा लावणे' या लीळेत सर्वज्ञ कोणाला म्हटले आहे?

उत्तर : चक्रधर स्वामी

११) 'उमाइनमस्कारें आगुंठा लावणे'  ही लीळा लीळा चरित्र ग्रंथातील कोणत्या क्रमांकाची लीळा आहे?

उत्तर : उत्तरार्ध ३८३

१२) नऊ नाड्यामध्ये ------------------- ग्रंथी आहेत असे सर्वज्ञ म्हणतात?

उत्तर : बहात्तर

१३) विटाळ कुठे झाला होता?

उत्तर : अंगठ्याला

१४) 'लीळाचरित्र' या ग्रंथाची निर्मिती केव्हा झाली?

उत्तर : इ. स. १२७८

---

**सार्वजनिक सत्यधर्म : महात्मा जोतीराव फुले**

१) सार्वजनिक सत्यधर्म या पाठाचे लेखक कोण आहेत?

उत्तर : महात्मा जोतीराव फुले

२) महात्मा फुले यांचा जन्म केव्हा झाला?

उत्तर : ११ एप्रिल १८२७

३) महात्मा फुले यांचा मृत्यू कधी झाला?

उत्तर : २८ नोव्हेंबर १८९०

३) सार्वजनिक सत्यधर्म या पठातून कोणता विचार व्यक्त झाला आहे?

उत्तर : एकाच कुटुंबातील लोकांनी विविध धर्माचे पालन कारणे

४)बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना कोणी केली?

उत्तर : महात्मा जोतिबा फुले

५) सार्वजनिक सत्यधर्म या पाठातून म. फुले यांनी कोणाशी संवाद साधला आहे?

उत्तर : गणपतराव

६) म. फुले यांनी ईश्वरासाठी कोणता शब्द वापरला आहे?

उत्तर : निर्मिक

७) म. फुले यांची पद्यरचना कोणती?

उत्तर : अखंडादि काव्यरचना

८) महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे अग्रणी म्हणून कोणाला संबोधले जाते?

उत्तर : म. फुले

९) शिवाजी महाराजांचा पोवाडा कोणी लिहिला?

उत्तर : म. फुले

१०) ब्राम्हणांचे  कसब, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा असूड, इशारा, सार्वजनिक सत्यधर्म इत्यादी पुस्तकांचे लेखक कोण आहेत?

उत्तर : म. फुले

---

**वाचन : गोपाळ गणेश आगरकर**

१) वाचन या पाठाचे लेखक कोण आहेत?

उत्तर: गोपाळ गणेश आगरकर

२) आगरकर लेखसंग्रह या पुस्तकाचे संपादक कोण आहेत?

उत्तर ग. प्र.  प्रधान

३) आगरकरांनी कोणते वृत्तपत्र काढले?

उत्तर: सुधारक

४) वाचन हा पाठ कोणत्या पुस्तकातून घेतला आहे?

उत्तर: आगरकर लेखसंग्रह

५) केशरीचे पाहिले संपादक कोण?

उत्तर : गोपाळ गणेश आगरकर

६) गोपाळ गणेश आगरकर यांनी कोणते वृत्तपत्र स्वतंत्रपणे काढले?

उत्तर : सुधारक

८) वाचन या पाठात ज्ञान संपादनाची किती साधने आगरकरांनी सांगितली आहेत?

उत्तर : पाच

९) वाचन या पाठात आगरकरांनी ज्ञान संग्रहाची कोणती पाच साधने सांगितली आहेत?

उत्तर : गुरुमुख, वाचन, विचार, अवलोकन, वाद

१०) कोणाशी संवाद साधल्याने नवीन ज्ञान प्राप्त होते?

उत्तर : श्रेष्ठांशी

११) बाल्यावस्थेत ज्ञान संपादनाची कोणती दोन स्थाने आहेत असे आगरकर म्हणतात ?

उत्तर : गृह आणि शाळा

१२) वाचनाचे किती प्रकार आगरकरांनी सांगितले आहेत?

उत्तर : दोन प्रकार

१३) वाचन या पाठामध्ये आगरकरांनी वाचनाचे कोणते दोन प्रकार सांगितले आहेत?

उत्तर : स्वतःसाठी आणि दुसऱ्यासाठी

१४) कोणतेही पुस्तक वाचनासाठी हातात घेताना कोणते दोन हेतू असतात?

उत्तर : माहिती आणि करमणूक

---

**भारतीय संविधानाची विज्ञाननिष्ठा : यशवंत मनोहर**

१) भारतीय संविधानाची विज्ञाननिष्ठा या पाठाचे लेखक कोण आहेत?

उत्तर : यशवंत मनोहर

२) यशवंत मनोहर यांचे 'स्मरणाची कारंजी' हे पुस्तक कोणत्या साहित्य प्रकारात मोडते?

उत्तर : प्रवासवर्णन

३) भारतीय संविधानाने दिलेली आदर्श जीवनमूल्ये कशी आहेत?

उत्तर : वैश्विक

४) भारतीय संविधानातील मूल्यांचा पाया काय आहे?

उत्तर : विज्ञाननिष्ठा

५) विज्ञान नीती माणसाला कोणता मार्ग दाखविते असे यशवंत मनोहर या पाठातून सांगतात?

उत्तर : स्वयंप्रकाशाचा

६) संविधानाच्या मूल्याचे स्वरूप कसे आहे?

उत्तर : मानवजातीच्या हिताचे

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूलभूत कर्तव्याची नोंद कोणत्या अनुच्छेदात केली आहे?

उत्तर : ५१ व्या अनुच्छेदात

८) विज्ञान दृष्टीत कोणती गोष्ट आवश्यक आहे असे या पाठातून यशवंत मनोहर सांगतात?

उत्तर : चिकित्सा

९) संविधानाच्या उद्देशिकेमध्ये -------------------- संक्षिप्त तपशील आला आहे?

उत्तर : मानवतावादाचा

१०) माणूस कसा असला पाहिजे असे यशवंत मनोहर सांगतात?

उत्तर : तार्किकवादी

---

**ही श्रीची इच्छा : श्रीनिवास ठाणेदार**

१) ही श्रीची इच्छा या पाठाचे लेखक कोण आहेत?

उत्तर : श्रीनिवास ठाणेदार

२) १६ वे जागतिक मराठी संमेलन कुठे भरले होते?

उत्तर : नागपूर

३) श्रीनिवास ठाणेदार यांचा जन्म कोणत्या शहरात झाला?

उत्तर : बेळगाव

४) श्रीनिवास ठाणेदार यांनी कोणत्या देशात उद्योग उभा केला?

उत्तर : अमेरिका

५) अमेरिकेतील कोणत्या राज्यातील निवडणूक श्रीनिवास ठाणेदार यांनी लढवली होती?

उत्तर : मिशिगन

६) अमेरिकेमध्ये मंदीची सावट कोणत्या वर्षी आली होती?

उत्तर : २००८

७) लेखकाच्या सुटकेस मध्ये कोणत्या महापुरुषांचे पुस्तक होते?

उत्तर : राजा शिवछत्रपती

८) डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्याकडे किती पेटंटस आहेत?

उत्तर : २८ पेटंटस

९) परम सुपर कॉम्प्युटर कोणी निर्माण केला आहे?

उत्तर : डॉ. विजय भटकर

१०) --------------- आता सारेच जण ग्लोबल नेटिझन्स आहेत?

उत्तर : इंटरनेटमुळे

११) विनोबा भावेंनी कोणता ग्रंथ लिहिला?

उत्तर : गीताई

१२) अजूनही जगात --------------------- पैशापेक्षा अधिक किंमत आहे आणि हे मी अनुभवातून सांगतो?

उत्तर : प्रमाणिकतेला

------------------------------------------------------------------------------------------------------------

**संतावणी : संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखामेळा, संत तुकाराम**

१) संत ज्ञानेश्वरांचा जन्म कधी व कोठे झाला?

उत्तर : १२७५ आपेगाव

२) ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे दुसरे नाव--------------- आहे?

उत्तर : भावार्थदीपिका

३) 'ज्ञानदेवे रचिला पाया' असे ज्ञानेश्वरांच्या संदर्भात कोणी म्हटले आहे?

उत्तर : संत बहिणाबाई

४) ' अरे अरे ज्ञाना झालासि पावन। तुझें तुज ध्यान कळों आलें ' या अभंगातून ज्ञानेश्वरांनी कोणता संवाद साधला आहे?

उत्तर : आत्मसंवाद

५) संत नामदेवाचा जन्म केव्हा झाला?

उत्तर : १२७०

६) संत नामदेवांचा मृत्यू केव्हा झाला?

उत्तर : १३५०

७) भागवत धर्माची पताका पंढरपूरपासून पंजाब पर्यंत कोणत्या संताने नेली?

उत्तर : संत नामदेव

८) संत नामदेवांची किती पदे गुरुग्रंथ साहेब या शिखांच्या पवित्र ग्रंथात समाविष्ठ आहेत?

उत्तर : ६१ पदे

९) नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी। या शब्दात आपल्या जिवीतकार्याच्या रूपरेषेचे निवेदन कोणी केले आहे?

उत्तर : संत नामदेव

१०) कीर्तनाचे प्रवर्तक कोण आहेत?

उत्तर : संत नामदेव

११) बाळक्रीडेचे अभंग कोणी लिहिले?

उत्तर : संत नामदेव

१२) निंदील हें जन सुखें निंदू द्यावे । सज्जनी क्षोभावे नये बापा। हा अभंग कोणाचा आहे?

उत्तर : संत नामदेव

१३) संत चोखामेळाचा जन्म कोठे झाला?

उत्तर : मंगळवेढा

१४) संत चोखामेळाचा समाधी काळ कोणता?

उत्तर : १३३८

१५) ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा। काय भुललासी वरलीया रंगा। हा अभंग कोणाचा आहे?

उत्तर : संत चोळामेळा

१६) संत तुकाराम महाराजांचे समग्र चरित्र कोणी लिहिले?

उत्तर : महिपती

१७) संत तुकाराम महाराज यांचा जन्म केव्हा झाला?

उत्तर : १६०८

१८) संत तुकाराम महाराज यांचा मृत्यू केव्हा झाला?

उत्तर : १६५०

१९)'जोडोनिया धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें वेच करी ' हा अभंग कोणाचा आहे?

उत्तर : संत तुकाराम

---

**या भारतात बंधुभाव नित्य वसू दे : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म कधी झाला?
   उत्तर : ३० एप्रिल १९०९

२) तुकडोजी महाराज यांचा जन्म कोठे झाला?

उत्तर : यावली

३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या कोणत्या चळवळीत सहभाग घेतला?

उत्तर : १९४२ चे भारत छोडो आंदोलन

४) तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत ही उपाधी कोणी दिली?

उत्तर : डॉ. राजेंद्र प्रसाद

५) राष्ट्रसंतांच्या विचारसरणीचे मूलभूत सूत्र कोणते?

उत्तर : ग्रामोन्नती

६) 'या भारतात बंधुभाव नित्य वसू दे' या कवितेचे कवी कोण आहेत?

उत्तर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

---

## झपूर्झा : केशवसुत

१) झपूर्झा या कवितेचे कवी कोण आहेत?

उत्तर : केशवसुत

२) आधुनिक मराठी काव्याचे जनक कोणाला म्हटले जाते?

उत्तर : केशवसुत

३)केशवसुतांचे पूर्ण नाव काय?

उत्तर : कृष्णाजी केशव दामले

४) सुनीत हा काव्यप्रकार मराठीत कोणी रूढ केला?

उत्तर : केशवसुत

५) झपूर्झा या कवितेमध्ये कशाचे वर्णन आले आहे?

उत्तर : कलावंताच्या मानसिक सुख दुःखाचे

६) केशवसुतांच्या काव्यावर कोणाच्या सुधारणावादाचा प्रभाव जाणवतो?

उत्तर : गोपाळ गणेश आगरकर

७) हर्षखेद ते मावळले

हास्य निमाले। अश्रू पळाले;

कंटक-शल्ये बोथटली,

माखमालीची लव वठली;

काही न दिसे दृष्टीला

प्रकाश गेला । तिमिर हरपला;

काय म्हणावे या स्थितीला

झपूर्झा , गडे झपूर्झा ! या काव्यपंक्ती कोणत्या कवितेतील आहेत?

उत्तर : झपूर्झा

---

**माझ्या मना बन दगड : विंदा करंदीकर**

१) माझ्या मना बन दगड या कवितेचे कवी कोण आहेत?

उत्तर  : विंदा करंदीकर

२) माझ्या मना बन दगड ही कविता विंदा करंडीकरांच्या कोणत्या काव्यसंग्रहातून घेतली आहे?

उत्तर : मृदगंध

३) विंदा करंदीकरांचा जन्म केव्हा झाला?

उत्तर : १९१८

४) विंदा करंदीकरांचा मृत्यू केव्हा झाला?

उत्तर : २०१०

५) विंदा करंदीकर यांना साहित्यक्षेत्रातील कोणता सर्वोच्च पुरस्कार प्राप्त झाला?

उत्तर : ज्ञानपीठ

६) स्वेदगंगा, मृदगंध, जातक, विरुपिका हे कवितासंग्रह कोणाचे आहेत?

उत्तर :  विंदा करंदीकर

---

**पाऊस : ग्रेस**

१) पाऊस या कवितेचे कवी कोण आहेत?

उत्तर  : ग्रेस

२) कवी ग्रेस यांचे पूर्ण नाव काय आहे?

उत्तर : माणिक सीताराम गोडघाटे

३) कवी ग्रेस यांचा जन्म केव्हा झाला?

उत्तर : १९३७

४) कवी ग्रेस यांचा मृत्यू केव्हा झाला?

उत्तर : २०१२

५) पाऊस ही कविता कोणत्या कवितासंग्रहातून घेतली आहे?

उत्तर : संध्याकाळच्या कविता

६) संध्याकाळच्या कविता, चंद्रमाधवीचे प्रदेश, राजपुत्र आणि डार्लिंग हे कविता संग्रह कोणाचे आहेत?

उत्तर : ग्रेस

७) २०११ चा साहित्य अकादमी पुरस्कार ग्रेसांच्या कोणत्या पुस्तकाला मिळाला?

उत्तर : वाऱ्याने हलते रान

८) "पाऊस कधीचा पडतो

झाडांची हलती पाने

हलकेच जाग मज आली

दुःखाच्या मंद सुराने" या काव्यपंक्ती कोणाच्या आहेत?

उत्तर : ग्रेस

९) "पेटून कशी उजळेना

ही शुभ्र फुलांची ज्वाला

ताऱ्यांच्या प्रहरापाशी

पाऊस असा कोसळला" या काव्यपंक्ती कोणत्या कवितेच्या आहेत?

उत्तर : पाऊस

---

## व्यावहरिक मराठी

## प्रसारमाध्यमांसाठी लेखन : डॉ. संजय भक्ते

१) आकाशवाणी हे प्रसार माध्यमाचे कोणते साधन आहे?

उत्तर : श्राव्य

२) दूरदर्शन हे प्रसार माध्यमाचे कोणते साधन आहे?

उत्तर : दृक श्राव्य

३) प्रसार माध्यमाचे किती उद्देश आहेत?

उत्तर : तीन

४) प्रसार माध्यमाचे तीन उद्देश कोणते?

उत्तर : माहिती देणे, शिक्षण देणे आणि करमणूक करणे

५) रेडिओ हे केवळ ----------------- आधारलेले आयामी माध्यम आहे?

उत्तर : ध्वनीवर

६) रेडिओ वरील वाचनाचा वेग कसा असावा?

उत्तर : मिनिटाला १०० ते १२० शब्द

७) रेडिओ वरील भाषणाचा अवधी साधारणपणे किती मिनिटांचा असतो?

उत्तर : १० मिनिटांचा

८) आकाशवाणीचे ब्रीद वाक्य कोणते आहे?

उत्तर : बहुजम हिताय बहुजन सुखाय

९) आकाशवाणीवरून युवकांसाठी कोणता कार्यक्रम सादर केला जातो?

उत्तर : युवावाणी

१०) देशात सर्वप्रथम आकाशवाणी केंद्र कोणत्या शहरात स्थापन झाले?

उत्तर : दिल्ली

११) ग्रामीण भागामध्ये रेडिओ वरील कोणत्या कार्यक्रमाद्वारे शेती आणि शेतीसंबंधी विषयावर सखोल प्रशिक्षण सुरू आहे?

उत्तर : नभोवाणी शेती शाळा

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

**प्रा.अमित वासुदेव गजभिये**
मराठी विभाग
डॉ. म. वा. पी. डब्ल्यू. एस.
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
कामठी रोड, नागपूर